१९५५ पासून निर्भिड लिखाण करणारे व महिलेने चालविलेले स्वतंत्र दैनिक

# लोकशाही

लोक LIVE
तुमच्या मनातलं...!
www.lokshahilive.com

इंटरनेट आवृत्ती - www.lokshahilive.com, https://www.facebook.com/lokshahilive/

www.lokshahilive.com

जळगाव ■ अंक – १९० ■ सोमवार, दि.२० मे २०२४ संपादिका : सौ. शांता वाणी ■ पाने ६ ■ किंमत ३ रु. ■ RNI NO.MAHMAR/2009/33028, REG.NO.JAL/16/2024-26 lokshahilive@gmail.com

## सोने-चांदी

■ सोने (प्रति १० ग्रॅम) : ७३,९३०
■ चांदी (प्रति १ किलो): ९१,१६०

## तापमान

■ कमाल : ३७ अंश सेल्सिअस
■ किमान : २० अंश सेल्सिअस

## महत्वाचे

### अबू सालेमला सतावतेय जीवाची भीती

**मुंबई –** १९९३ मधील मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपी अबू सालेम याला जीवाची भीती सतावत आहे. तळोजा कारागृहातून इतर कारागृहात स्थलांतर करण्याच्या बहाण्याने आपले एनकाऊंटर होऊ शकते अशी भीती त्याने व्यक्त केली आहे. इतकंच नाही तर त्याने असे स्थलांतर करण्यास परवानगी नाकारण्याची न्यायालयाकडे याचिकेद्वारे विनंती केली आहे. सुनावणीअंती अबू सालेमचे पुढील निर्देशांपर्यंत तळोजा कारागृहातून स्थलांतर करु नये, असे निर्देश विशेष न्यायालयाने तळोजा कारागृह प्रशासनाला दिले आहेत. १९९३ मधील बॉम्बस्फोट प्रकरणातील दोषी असलेल्या अबू सालेमचे पोर्तुगाल येथून भारतात प्रत्यार्पण करण्यात आले होते. ऑर्थररोड कारागृहात डोसाच्या सहकाऱ्याने हल्ला केल्यावर त्याला ठाणे कारागृहात ठेवण्यात आले होते. मात्र नंतर पुन्हा तळोजा कारागृहात ठेवण्यात आले.

### व्यावसायिकाच्या मुलाने घेतले दोन बळी

**पुणे –** पुणे शहरात पुन्हा एक भीषण अपघात झाला आहे. पुण्यातील एका प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिकाच्या मुलाने मद्यधुंद अवस्थेत भरधाव वेगाने गाडी चालवत दोघांना धडक दिली. या अपघातात दोघांचा मृत्यू झाला. हा अपघात शनिवारी मध्यरात्री अडीच वाजण्याच्या सुमारास कल्याणीनगर येथे घडला. या प्रकरणी येरवडा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आली आहे. हा भीषण अपघात करणाऱ्या अल्पवयीन आरोपी विरोधात गुन्हा दाखल करून ताब्यात घेण्यात आलेले आहे. अपघात इतका भीषण होता की धडकेनंतर दुचाकीवर असलेली मुलगी हवेत उडली. त्यानंतर जमिनीवर आदळून त्यांचा जागीच मृत्यू झाला.

### युट्युब पाहून टाकला नोटा बनविण्याचा कारखाना

**मुंबई –** मोबाईल सर्वांच्या हातात आल्यानंतर कोणत्याही विषयावर माहिती मिळवणे सोपे झाले आहे. यूट्यब आणि गुगलवर माहितीची खजीना मिळतो. एका नवीन पास असलेल्या २६ वर्षीय तरुणाने गजबचे काम केले. त्या तरुणाने यूट्यूबवर नोटा छापण्यासंदर्भातील व्हिडिओ पाहिले. त्यानंतर स्वत:च बनावट नोटा टाकण्याच्या कारखाना टाकला. लाखो रुपयांच्या नोटा त्या तरुणाने चलनात आणल्या आहे. प्रफुल्ल पाटील असे त्या तरुणाचे नाव असून नवी मुंबई पोलिसांनी त्याला तळोजा परिसरातून अटक केली आहे. नवी मुंबईतील तळोजा परिसरात प्रफुल्ल पाटील (२६) हा तरुण राहतो.

# शिंदेंना मुख्यमंत्री करण्यास आमची हरकत नव्हती

## शरद पवारांचा सर्वात मोठा गौप्यस्फोट : २०१४ मध्येच महाविकास आघाडी सरकार स्थापन करण्याचा प्रयत्न होता

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी सर्वात मोठा गौप्यस्फोट केला आहे. शरद पवार यांनी एका वृत्तपत्राला मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी याबाबत अनेक गौप्यस्फोट केले. विधानसभेच्या २०१९ च्या निवडणुकीनंतर महाराष्ट्राच्या राजकारणात भरपूर उलथापालथ झाली. शिवसेना पक्षाने भाजपसोबतची युती तोडत विरोधात असलेले राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस या दोन पक्षांसोबत महाविकास आघाडीची स्थापना करत राज्यात नवं सरकार स्थापन केलं. त्यावेळी मुख्यमंत्रीपद शिवसेनेला देण्यात आलं. त्यावेळी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसच्या इतर दिग्गज नेत्यांच्या आग्रहानंतर उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. नाहीतर सध्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाच त्यावेळी मुख्यमंत्री पदाची जाबबदारी देण्यात येणार होती, असा दावा ठाकरे गटाच्या नेत्यांकडून नंतर करण्यात आला. याचबाबत शरद पवार यांनी सर्वात मोठा गौप्यस्फोट केला आहे. एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री करण्यास आमची हरकत नव्हती, असा मोठा गौप्यस्फोट शरद पवारांनी केला.



एकनाथ शिंदे यांचा मुख्यमंत्री करण्यास आमची हरकत नव्हती. पण त्यांचं नाव आमच्यापुढे आलं नाही. शिवसेनेच्या नावाबद्दल शिवसेनेअंतर्गत चर्चा झाल्याचं नंतर समजले, असं शरद पवार यांनी स्पष्ट केलं आहे.

विधानसभेच्या २०१९ च्या निवडणुकीनंतर एकनाथ शिंदे यांना महाविकास आघाडीच्या सरकार स्थापनेच्या वेळी मुख्यमंत्रीपदी विराजमान करण्यास मविआच्या इतर नेत्यांचा विरोध होता, अशी चर्चा तेव्हा सुरु होती. राष्ट्रवादी आणि काँग्रेसचे अनेक दिग्गज नेत्यांच्या अनुभव हा एकनाथ शिंदे यांच्यापेक्षा जास्त असल्यामुळे हे दिग्गज नेते एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात काम करण्यास सकारात्मक नव्हते, अशी चर्चा त्यावेळी राजकीय वर्तुळात सुरु होती. याबाबत शिवसेनेच्या ठाकरे गटाच्या नेत्यांनी त्यावेळी अशाचप्रकारच्या प्रतिक्रिया दिल्या होत्या. तसेच २०२२ मध्ये सत्तापरिवर्तन झाल्यानंतरही ठाकरे गटाकडून हाच दावा करण्यात येत होता. पण आता शरद पवार यांनी आपला शरद पवार यांना मुख्यमंत्री करण्ययास विरोध नव्हता, असं स्पष्ट म्हटल्याने नेमकं खरं कोण बोलतंय? असा प्रश्न उपस्थित होतोय.

आम्ही कुटुंबप्रमुख म्हणून मुलगी सुप्रिया सुळे, पुतणे अजित पवार यांच्यात कधीही भेद केला नाही. अजित दादांना उपमुख्यमंत्रीपद, मंत्रीपद, विरोधी पक्षनेतेपद, विधिमंडळ पक्षनेतेपद अशी सर्व पदं दिली. एवढं सारं होऊनही पक्षात काम करण्यास संधी मिळाली नाही. ही अजित पवारांची ओरड निरर्थक आहे, असं शरद पवार म्हणाले.

२००४ मध्ये पक्षाकडे मुख्यमंत्रीपदासाठी योग्य नेता नव्हता. अजित पवार त्यावेळी नेता नव्हता. अजित दादा नवखे होते. त्यावेळी छगन भुजबळ यांच्याकडे मुख्यमंत्रीपद पान २ वर »

# मी भारतातील १३०० बेटांचा शोध लावला

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**नवी दिल्ली** प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सध्या सुरू आहे. या निवडणुकीच्या प्रचारात अनेक मुद्दे चर्चेत आले. यामध्ये काही दिवसांपूर्वी भारत आणि श्रीलंकेदरम्यानच्या कच्चथिवू बेटाचा मुद्दा राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरला.

भारतात लोकसभा निवडणुकांचं वातावरण तापलेलं असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एका सभेत बोलताना कच्चथिवू बेटावरून काँग्रेसवर केलेल्या आरोपांची चर्चा रंगली होती. याच अनुषंगाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही दिवसांपूर्वी गुजरातमधील जुनागढ येथे एका सार्वजनिक सभेला संबोधित करताना केलेलं एक वक्तव्य आता चर्चेत आलं आहे.



मी भारतातील १३०० बेटांचा शोध लावला असून त्यातील काही बेट सिंगापूरपेक्षाही मोठी आहेत, असं विधान पंतप्रधान मोदी यांनी केलं होतं.

देशात काँग्रेसचे सरकार असताना भारतातील बेटांच्या संख्येबाबत सरकारकडे कोणतीही अचूक माहिती नव्हती. मात्र, मी पंतप्रधान झाल्यानंतर सरकारने उपग्रह सर्वेक्षण केले. त्यानंतर आपल्या भारताच्या समुद्र किनाऱ्यांच्या आसपास १३०० पेक्षा जास्त बेटे आहेत हा शोध लावला. त्यापैकी काही सिंगापूर पेक्षाही मोठे आहेत. यानंतर मी हा निर्णय घेतला की त्यापैकी काही निवडक बेटे पर्यटनासाठी विकसित करण्यात येणार आहेत. लोक पर्यटनासाठी बाहेर जाणार नाहीत. पर्यटनासाठी बाहेर देशातील पर्यटक आपल्या देशात येतील, असं पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं होतं.

पंतप्रधान मोदी यांनी या मुद्यांवर बोलताना काँग्रेसवर हल्लाबोल केला होता. ते म्हणाले होते की, असे अनेक बेटे आहेत तेथे कोणीही राहत नाही. मात्र, काँग्रेसची सत्ता असती तर काँग्रेसने अशा बेटांचा सौदा केला असता. त्यामुळे काँग्रेसच्या विचारधारेपासून सावध राहिलं पाहिजे. काँग्रेस जो पर्यंत सत्तेत राहिली तो पर्यंत देशाच्या सुरक्षेला डावावर लावण्याच काम काँग्रेसनं केलं, असा हल्लाबोल पंतप्रधान मोदी यांनी केला.

# भाजपने राममंदिर प्राणप्रतिष्ठेला राजकीय कार्यक्रम बनवलं होतं

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**नवी दिल्ली** वृत्तसंस्था

भारतीयांना गेल्या अनेक दशकांपासून अयोध्येतील श्री राम मंदिराची प्रतीक्षा होती. अखेर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते अयोध्येतील मंदिरात श्री रामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. भारतीय जनता पार्टी, श्री रामजन्मभूमी ट्रस्ट आणि इतर हिंदुत्ववादी संघटनांनी या दिवशी अयोध्येत भव्यदिव्य कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. आयोजकांनी देशभरातील दिग्गज अभिनेते,



कलाकार आणि क्रिकेटपटूंपर्यंत अनेकांना या कार्यक्रमाचं निमंत्रण पाठवलं होतं. भाजपाचे नेते, वेगवेगळ्या राज्यांचे मुख्यमंत्री, संत-महंत आणि विरोधी पक्षांमधील नेत्यांनादेखील या कार्यक्रमाचं निमंत्रण पाठवण्यात आलं होतं. देशातील प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसला आणि काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांनादेखील भाजपाने या सोहळ्याचं निमंत्रण पाठवलं होतं. मात्र काग्रेसने विनम्रपणे हे निमंत्रण नाकारलं. कोणताही काँग्रेस नेता या कार्यक्रमाला उपस्थित राहिला नाही.

राम मंदिरातील प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला न जाणाऱ्या काँग्रेस नेत्यांवर पंतप्रधान नरेंद्र मोदींपासून कित्येक भाजपा नेत्यांनी टीका केली होती. भाजपा नेते लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यानही यावरून काँग्रेसवर टीका करत आ-हेत. भाजपा आणि पान २ वर »

# मोबाईल लांबविणाऱ्या दोन भामट्यांना अटक

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पाचोरा** प्रतिनिधी

शहरातील बस स्थानकातून काही वेळाच्या अंतराने तीन जणांचे मोबाईल चोरीस गेल्याची घटना दि. १७ मे रोजी उघडकीस आली. दरम्यान, पाचोरा पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकातील कर्मचाऱ्यांनी अवघ्या काही तासातच नाजीम मोहम्मद पठाण (वय ३२,रा. दूध फेडरेशन), अमजद रशीद शेख (वय ३३, रा. भिवंडी, जि. ठाणे) या दोघांच्या मुसक्या आवळल्या. त्यांच्याविरुद्ध पाचोरा पोलीस स्टेशनला गुणही दाखल करण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील घाटनांद्रा येथील वृत्तपत्र विक्रेता श्रीराम रेवननाथ जोशी हे पाचोरा बस स्थानकातून सुरत बसने धुळे येथे जाण्यासाठी निघाले. बसमध्ये चढतांना त्यांच्या पॅन्टच्या खिशातून चोरट्याने मोबाईल चोरुन नेला. ते मोबाईल शोधत असतांना बसस्थानक परिसरात असलेले तारकेश राजेंद्र पाटील (रा. गजानन नगर, पान २ वर »

# सूर्य आग ओकू लागला; पारा ४५ अंशांवर!

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

गेल्या आठवड्याभरापासून जळगाव शहराचे तापमानात चढ-उतार होत असल्याने ४२.२ अंशावर तापमान स्थिरावले होते. मात्र, पुन्हा तापमानाचा पारा वाढून ४५ अंशावर येऊन पोहचला आहे. त्यामुळे जळगावकरांना मे हिटच्या चटक्यांचा प्रकर्षाने सामना करावा लागत आहे.

मार्च, एप्रिल महिन्यात तापमानाच्या पाऱ्याने चाळीशी पार केली होती. वादळी वारा, अवकाळी पाऊस अशा वातावरणात ६ ते ११ मे दरम्यान



४१ आणि ४२ अंशावर तापमान राहिले. तसेच १३ ते १७ मे दरम्यान ४२.४ अंशापर्यंत पारा पोहोचला होता. शनिवारी तापमानाचा पारा वाढल्याने ४३ अंशावर नोंद झाली तर आज रविवारीही सायंकाळी ५ वाजेपर्यंत ४३ अंशापर्यंत तापमान जाऊन पोहचल्याची माहिती तज्ज्ञांनी दिली.

जळगाव शहराबरोबरच ग्रामीण भागात सूर्य जणू आग ओकत आहे. सकाळी ८ वाजेपासूनच सूर्याच्या किरणांचे चटके असह्य होत आहे. तर दुपारी १२ वाजेपर्यंत उन्हाच्या तीव्र झळांनी अंगाची लाही लाही होत असल्याने दुपारी १२ ते ४ वाजेच्यादरम्यान शहरातील रस्ते निर्मनुष्य राहत असल्याचे चित्र आहे. सध्या तापमानाचा पारा ४३ अंशावर पोहोचल्याने कुलर, एसीचा गारवा घेण्याकडे नागरिकांचा कल वाढला आहे. तर संध्याकाळी शहरातील थंडपेय विक्री करणाऱ्या दुकानांवर गर्दी वाढू लागली आहे.

# एरंडोलात दीड लाख बीटी बियाण्यांची मागणी मंजूर

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**एरंडोल** प्रतिनिधी

तालुक्यात खरीप हंगाम पूर्व बागायती कापूस लागवडीसाठी शेतकऱ्यांची लगबग दिसून येत आहे. एरंडोल तालुक्यात २९ हजार ५०० हेक्टरवर कापूस लागवड होण्याची शक्यता कृषी विभागातर्फे व्यक्त करण्यात आले आहे. त्यासाठी एक लाख ४३ हजार पाचशे बीटी कापूस बियाणे पाकिटांची मागणी करण्यात आली असून सदर मागणी प्रमाणे कापूस बियाणे पाकिटे मंजूर झाली आ-हेत.

गेल्या चार वर्षांपैकी यावर्षी पहिल्यांदाच १६ मे २०२४ पासून कापूस बियाणे शेतकऱ्यांना अधिकृत विक्रेत्यांमार्फत विक्रीस उपलब्ध होत आहेत. शेतकऱ्यांनी एक जून २०२४ पासून कापूस बियाणे लागवड करावी असे आवाहन तालुका कृषी विभाग व पंचायत समिती कृषी विभाग यांच्यातर्फे करण्यात आले आहे. १९ मे २०२४ पर्यंत १५ हजार बीटी कापूस पान २ वर »

# जंगलातील प्राण्यांच्या दर्शनासाठी वनविभाग सज्ज

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**यावल** प्रतिनिधी

यावल तालुक्यातील सातपुडा वनक्षेत्रात वनविभागाकडून बुद्ध पौर्णिमेस जगंलात असलेल्या प्राणी गणनेसाठी, यावल वनविभागाने पूर्वतयारी म्हणून मचान उभारणेसह आवश्यक तयारी पूर्ण केली आहे. यावल वन विभागात एकूण ४३ मचान उभारल्याची माहिती यावल वनविभागाचे सह. वन संरक्षक प्रथमेश हाडपे यांनी दिली आहे.

यावल वनविभाग अंतर्गत असलेल्या चोपडा वनक्षेत्र ३, वैजापूर वनक्षेत्र ७, अडावद वन-क्षेत्र ४, देवगिरी क्षेत्रात ४, यावल पूर्व वनविभाग ७, यावल पश्चिम



वनविभाग ६, रावेर वनक्षेत्र १२ असे एकूण ४३ मचान उभारण्यात आले आहे.

बौद्ध पौर्णिमेच्या रात्री चंद्राच्या शीतल व लख्ख प्रकाशात जंगलातील प्राण्यांचे विविध थरार अनुभवण्याची संधी यावर्षीही जंगल सफारींना अनुभवता येईल एका मचानवर पाच ते सहा व्यक्ती बसू शकतील अशी व्यवस्था करण्यात आली आहे. जंगलातील असलेल्या पानवट्यावर प्राणी पाणी पिण्यासाठी येत असताना जंगलात भटकंती पान २ वर »

# जैन इरिगेशनचा वार्षिक एकत्रित नफा ९१ कोटी

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

देशातील सर्वात मोठी सिंचन प्रणाली कंपनी जैन इरीगेशन सिस्टिम्स लिमिटेडने ३१ मार्च २०२४ रोजी समाप्त होणाऱ्या तिमाही आणि वर्ष अखेरीचे स्टॅण्डअलोन आणि कन्सोलिडेटेड आर्थिक निकाल आज १८ मे रोजी जाहीर केले. यात कंपनीच्या कन्सोलिडेटेड वार्षिक विक्रीत ७ टक्क्यांची वाढ व नफा ९१ कोटी रुपये झाला आहे. जळगाव येथे झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत आर्थिक निकाल मंजूर करण्यात आले.

**आर्थिक निकालाची वैशिष्ट्ये:**
वार्षिक आधारावर आर्थिक वर्ष २०२३-२४ चा ७.० टक्क्यांनी विक्री वाढ. वार्षिक आधारावर २०२४ वर्षाचा कन्सोलिडेटेड एबिटा १६.८ % वाढला. चालू आर्थिक वर्षात एकत्रित कर पश्चात नफा हा ९१ कोटी रुपयांचा दिसतो, गत वर्षांची तुलना केली असता १२०.८ कोटी रुपये इतका तोटा होता. वार्षिक आधारावर २०२४ वर्षाचे स्टॅण्डअलोन एबिटा १०.३ टक्क्यांनी वाढला. वार्षिक आधारावर आर्थिक पान २ वर »

## कंपनीच्या एकत्रित महसुलात ७ टक्क्यांची वाढ



चालू आर्थिक वर्षात पावसाळा सामान्य असेल असे हवामान खात्यातर्फे सांगण्यात आले आहे. चालू असलेल्या लोकसभा निवडणुकांमुळे चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत एकूण व्यवसायावर थोडा परिणाम होऊ शकतो, तथापि, आम्ही व्यवसायाच्या गुणवत्तेवर लक्ष केंद्रित केले, आम्ही किरकोळ व्यवसाय वाढवून नफा सुधारण्यासाठी वचनबद्ध आहोत.

**अनिल जैन, उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक,**
जैन इरिगेशन सिस्टीम्स लि. जळगाव

# चांदी होणार लाखमोलाची; साडेतीन हजारांनी उसळी

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

सोन्याचे दर सातत्याने वधारत असताना, चांदीने अचानक उसळी घेत दराचा ऐतिहासिक उच्चांक गाठला आहे. शुक्रवारीपासून चांदीचे भाव गगनाला भिडत आहेत. शनिवारी रात्री चांदी तब्बल साडेतीन हजारांनी वधारल्याने आजवरचे विक्रम मोडीत निघाले. चांदी ९० हजार १०० रुपये प्रतिकिलोवर पोहोचली असून, लवकरच

## दर नव्वद हजारांवर : सोन्याचे दर मात्र वधारले




ती लाखाचा टप्पा गाठण्याची चिन्हे आहेत.

आंतरराष्ट्रीय कारणांमुळे गेल्या काही दिवसांपासून सोने सातत्याने वधारत आहे. गेल्या दिवाळीत ६१ ते ६२ हजार रुपये प्रतितोळा असलेले सोने मार्चपर्यंत स्थिर होते. ४ मार्चपासून सोन्याच्या दरात तेजी आली. गेल्या दीड महिन्यात सोने तब्बल बारा ते चौदा हजार रुपयांनी वधारले. शनिवारी ते ७७ हजार ७०० रुपये होते. सोन्यासह गेल्या काही महिन्यांपासून चांदीच्या दरातही अचानक तेजी आली आहे. गेल्या वर्षभरापासून चांदी ६५ ते ७५ हजार रुपये प्रतिकिलोवर स्थिर होती. गेल्या महिन्यात गुढीपाडव्यादरम्यान ती ७९ हजार रुपयांवर होती. त्यानंतर हळूहळू वाढत जाऊन ती ८७ हजारांपर्यंत गेली. मात्र, शुक्रवारीपासून अचानक उसळी घेत ९० हजारांचा टप्पा ओलांडला. हा आजवरच्या इतिहासातील विक्रमी दर आहे.

### उद्योगांत वाढला वापर

इलेक्ट्रिक उद्योगात अनेक उत्पादनांत चांदीचा वापर वाढला असून, वाहनांसाठी लागणाऱ्या सेमी कंडक्टरमध्येही ती वापरली जाते. त्यामुळे चांदीच्या मागणीत वाढ होत आहे. आंतरराष्ट्रीय घडामोडींमुळेही सोने-चांदी वधारत असल्याचे अभ्यासकांचे म्हणणे आहे.

पान ५ वरून

## आद्य शंकराचार्य जयंतीनिमित्त....

सगळ्यांच्या समोर असुन त्यांना अभिप्रेत असलेले धार्मिक सहिष्णुता जप्त आपण आपलं आयुष्य जगायला हवं असं प्रतिपादन ह. भ. प. कडोबा महाराज माळी यांनी केले आहे. हो. भ. प. भागवत महाराज हिवाळे यांच्या प्रयत्नामुळे शेंदुर्णी येथील श्री. त्रिविक्रम मंदिरात एकादशी ला आद्य शंकराचार्य यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी हे. भ. प. कडोबा महाराज माळी यांनी आद्य शंकराचार्य यांच्या जीवन कार्याची माहिती दिली. यावेळी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

## अल्पवयीन मुलीवर अतिप्रसंग...

पोलिसांना दिलेल्या जबाबावरून आरोपी धीरज फुगारे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपास पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत पाटील यांनी केला.

## पाल वनोद्यानातील पुरातन....

अस्तित्व आज धोक्यात आले आहे. मागिल ३ वर्षापासून नागझिरी कूंड आटले आहे. हि बाब लक्षात घेऊन दि. १९/०५/२०२४ रोजी प्रादेशिक वनविभागाचे उपवनसंरक्षक जमीर शेख, संवस यावल प्रथमेश हडपे याच्यां मार्गदर्शनाखाली रावेर वनक्षेत्रातील वनपरिक्षेत्र अधिकारी-अजय बावणे यांच्या आदेशान्वये वनपाल अरुणा ढेपले, दिपक रायसिंग, वनरक्षक- मुकेश तडवी, संजय राजपुत, लेदा बारेला, राजु बोंडल, युवराज मराठे व अधि. वनमजुर- मयबु तडवी, शेख वजीर अब्दुल, नवाज तडवी, सुभान तडवी, दिडका बारेला, हुसेन तडवी, सबाज तडवी, संजु तडवी, गोटूराम बारेला, प्यारसिंग बारेला, जावेद तडवी, संजय पवार, युनूस तडवी, अल्लाबक्ष तडवी, अरमान तडवी, बाळु राठोड, रुस्तम तडवी, गुलशेर तडवी, हमीद तडवी, राजु तडवी, उघडू तडवी, भुरेखा तडवी या वनकर्मचाऱ्यांनी पाल वनउद्यान येथील पुरातन नागझिरी जल कुडांत साचलेला गाळ हा क्षमदानातुन काढून नागझिरी जल कुंड हे स्वच्छ करण्यात आले. या कूडांतून गाळ निघाल्याने पावसाळ्यात २१ गौमूखातून पाणी पिण्याची व्यवस्था होईल. यावल वनविभागाअंतर्गत ७ वनपरिक्षेत्रामध्ये जुने नैसगिर्क पाणवठे जलकुडा पुर्ण जीवीत करण्याचे कार्यक्रम आखण्यात आले आहेत. त्यांचा एक भाग म्हणून पाल वनोद्यान, रावेर वनक्षेत्रातील पाल वनोद्यान मधील ७०० वर्ष जुने नैसगिर्क नागझिरी जलकुंभचे स्वच्छता व गाळ काढून त्याला पुर्ण जीवीत करण्याचे उद्देशाने रावेर येथील वनकर्मचारी यांनी क्षमदानातुन काम केले, अशी माहिती यावल वन विभागाचे उपवनसंरक्षक जमीन एम. शेख यांनी दिली.

## महेश पाटील यांची शिरसाड...

मार्गदर्शन केले. यावेळी वाचनालयाचे सचिव तथा यावल शेतकरी खरेदी विक्री संघाचे उपसभापती तेजस धनंजय पाटील यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी रवींद्र धनगर, लीलाधर धनगर, विकास वाघ तथा सर्व सहकारी मित्र व वाचनालयातील विद्यार्थी उपस्थित होते. महेश पाटील यांनी शून्यातून स्वतःची वेगळी ओळख आज पुण्यासारख्या शहरात निर्माण केली आहे. त्यांच्यामुळे महाराष्ट्रातील असंख्य विद्यार्थी अधिकारी पदापर्यंत पोहोचले आहेत. महेश पाटील यांच्या कार्यकर्तृत्वामुळे आमच्या शिरसाड गावाचा नावलौकिक वाढला आहे असे तेजस पाटील यांनी सांगितले.

## पोलिस निरीक्षक सचिन ....

महत्त्वपुर्ण भुमिका बजावली आहे. या कार्याची दखल घेत नुकतेच जळगांव येथे जिल्हा पोलिस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांच्या हस्ते या सर्व टीमचा गौरव करण्यात आला. योवेळी जळगाव विभागाचे अपर पोलिस अधीक्षक अशोक नकाते, चाळीसगाव विभागाच्या अप्पर पोलीस अधीक्षक कविता नेरकर पवार पाचोरा विभागाचे विभागीय पोलिस अधिकारी धनंजय येरुळे आदी उपस्थित होते.

## विकास कामांच्या संथ गतीमुळे ....

कामे हाती घेतले असुन या भागातील गटारी खोदुन काही महिने उलटले असुन कोणतेच काम केल्या जात नाही.या गटारी खोदकाम केल्याने रहदारीला अर्थळा निर्माण झाला आहे. याच भागात राहणारा दिव्यांग शिवा ठाकुर याला आपली तीनचाकी सायकल घेउन येता जातांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.त्याला घरापासुन मुख्य रस्त्यावर येण्यासाठी फिरून यावे लागत आहे. या दिव्यांग शिवासह नागरीकांना या विकास कामाचा ञास सहन करावा लागत असुन हे काम त्वरीत करावे अशी मागणी जोर धरू लागली आहे. या विकास कामाचा नेमका ठेकेदार कोण आहे ? प्रशासन या कामाकडे लक्ष का देत नाही ? अशी अनेक प्रश्न यामाध्यमातुन समोर आली आहेत.

## वाहनाच्या धडकेत मोटरसायकलस्वार....

रुग्णालयात दाखल करण्यात आला आहे.

यशवंत माळी हे खाजगी फायनान्स कंपनीत वसुली कर्मचारी म्हणून कार्यरत होते. त्यांच्या अपघाती निधनाने मांदुर्णे गावासह परिसरात शोककळा पसरली आहे. धडक देणाऱ्या अज्ञात वाहनाचा शोध पाचोरा पोलिस घेत आहेत. मयत यशवंत माळी हे अविवाहित असुन त्याचे पाश्चात्य आई, वडील, एक भाऊ, एक बहीण असा परिवार आहे.

## चुंचाळ्यात गुरुशिष्य पुण्यतिथीचा....

**असा साजरा होतो अनोखा सोहळा**

वासुदेव बाबा हे नेहमी वैशाख शुध्द बारसला त्यांचे गुरु रघुनाथ बाबा यांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम करत होते. तेव्हा ते भक्ताना सांगायचे की, मी समाधिस्त झाल्यावर सुद्धा माझ्या गुरुची पुण्यतिथी साजरी करीत जा. परंतु गावातील गावकरी व शिष्यगाण तुम्ही जसे तुमच्या गुरुची पुण्यतिथी साजरी करतात, तशिच आम्ही तुमचीही पुण्यतिथी साजरी करत जाऊ. आपल्या गुरुची आपल्यानतरही पुण्यतिथी व्हावी म्हणूनच आपल्या गुरुच्या पुण्यतिथी दिवशीच वासुदेव बाबा समाधिस्थान झाले. तर २००१ पासुन असा गुरु शिष्य पुण्यतिथीचा सोहळा होऊ लागला. या सोहळ्यासाठी मध्यप्रदेश, गुजरात, कर्नाटक येथील भाविकांचा यात समावेश आहे.

**असा होईल कार्यक्रम**

पहाटे ५ ला मुर्तीचे स्नान व समाधी स्नान ६ ला मारुती अभिषेक दुपारी १२ ला महाआरती सायंकाळी ७ ला आरती सकाळी ८ ते रात्री पर्यंत आरतीवेळ सोडून भजन. भारुड सुरु राहतील महाप्रसादात ९ क्विंटल आंब्याचा रस तर ११ क्विंटल पुरणपोळीचा महाप्रसाद वाटप होईल दुपारी १ ते रात्रीपर्यंत महाप्रसादाचे वाटप होईल. भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा.असे आवाहन श्री.समर्थ वासुदेव बाबा भक्तगण व भंजनी मंडळ आणि गावकरी मंडळीने केले आहे.

## चिनावलला संचारबंदीच्या दुसऱ्या...

गावात कोणतीही दुकाने व आस्थापने सुरू नसल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. दरम्यान दि १८ रोजी संध्याकाळी ५ ते ६ या वेळेत गुरे, ढोरे व चारा पाणी तसेच दुध काढण्यासाठी १ तासाची सुट दिली होती. दरम्यान काल १९ रोजी गावात सर्वत्र शुकशुकाट असून आता पोलीस आता घटनेच्या चौकशीसाठी अलर्ट मोड आले असून सर्व प्रकारच्या चौकश्या करीत आहेत. तर गावात जिल्हा पोलिस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली अप्पर पोलीस अधीक्षक नखाते, मुक्ताईनगर विभागाचे उपविभागीय पोलिस अधिकारी राजकुमार शिंदे, सावदा पो स्टेशनचे सपोनी जालिंदर पळे, पो उप निरीक्षक खांडबहाले, गर्जे हे तळ ठोकून आहेत. दरम्यान पोलिसांच्या मोठ्या फौजफाट्याने संपूर्ण चिनावल गावाला पोलिस छावणीचे स्वरूप आले असून महसूल विभागिचे अप्पर तहसीलदार मयूर कळसे, नायब तहसीलदार संजय तायडे मडळाधिकारी अनंत खवले, तलाठी लिना राणे हे सुद्धा संचारबंदी त लक्ष ठेवून आहे तर आज दि २० रोजी संचारबंदी मध्यरात्री संपणार असल्याने चिनावल येथे वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक होण्याची शक्यता अपेक्षित आहे.

# जैन स्पोर्टस अकॅडमीच्या समर कॅम्पचा समारोप



**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

'आरोग्यपूर्ण डायट, नैतिकता, शिस्त आणि सर्वांगिण व्यक्तिमत्त्वासाठी जैन स्पोर्टस समर कॅम्प चे आयोजन खुप महत्त्वपूर्ण ठरले. ग्रामीण भागातील खेळाडूंना व्यासपिठ उपलब्ध करून खेळ, खेळाडूंचे भवितव्य घडविले जात आहे, यासाठी जैन इरिगेशनचे अशोक जैन, अतुल जैन सदैव प्रयत्न करत आहे. असे मनोगत रणजीपटू समद फल्लाह यांनी व्यक्त केले.

जैन स्पोर्टस कडमीचा समर कॅम्प -२०२४ चा समारोप झाला. त्याप्रसंगी ते बोलत होते. आंतरराष्ट्रीय करम खेळाडू आयशा मोहम्मद हिने प्रेरणादायी मार्गदर्शन केले. याप्रसंगी व्यासपिठावर प्रमुख अतिथी म्हणून जैन परिवारातील अभंग जैन होते. सोबत आंतरराष्ट्रीय करम खेळाडू आयशा मोहम्मद, संदीप दिवे, महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे माजी रणजीपटू समद फल्लाह, जळगाव जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे उपाध्यक्ष एस. टी. खैरनार, जैन स्पोर्टस कडमीचे प्रशासकीय अधिकारी अरविंद देशपांडे, सुनील व्यवहारे, आविनाश लाठी, संजय पवार उपस्थित होते.

जैन इरिगेशन, भवरलाल ण्ड कांताबाई जैन फाऊंडेशन, अनुभूती स्कूल, कांताई नेत्रालय यांच्या सहकार्याने दि.१५ एप्रिल ते १८ मे पर्यंत समर कॅम्प चे आयोजन केले होते. क्रिकेट, बडमेंटन, बुध्दिबळ, बास्केटबाल, तायक्वांदो, फुटबाल या खेळांमध्ये ४१० खेळाडूंनी सहभाग घेतला. अनुभूती निवासी स्कूल, अनुभूती इंग्लिश मिडीअम स्कूल सेंकडरी, कांताई सभागृह याठिकाणी समर कॅम्प चे आयोजन केले होते. २०२३-२४ या वर्षात जे खेळाडू यशस्वी झाले अशा १०१ खेळाडूंचा गौरव केला गेला.सुयश बुरूकुल यांनी समर कॅम्प विषयी सांगितले. सूत्रसंचालन वरूण देशपांडे यांनी केले. समर कॅम्प मध्ये बडमेंटनमध्ये उत्कृष्ट खेळाडू राखी ठाकूर, गणेश पंडीत,मोकक्षा जाखेटे, शोनब माहेश्वरी, बास्कटेबाल रिशीता वाणी, चंद्रविर परदेशी, युदीप लाडवंजारी, विरेन वसराणी, गार्गी वाणी, पुर्वा हटकर, करममध्ये धृव बारी, धिरज घुगे, बुध्दिबळ राघव वाघळे, हर्षदा पाटील, पुनित वारके, विद्या बागुल फुटबालमध्ये कार्तिक पाटील, दर्श बडगुजर, आरव सोनी, चेतन चौहान, निखील साळुंखे, तायक्वांदो मध्ये तनिया सुतार, वंश सोनवणे, कोमल घढे, दर्शन कांडवे, सिमरण बोरसे, तर क्रिकेट मध्ये उत्कृष्ट फलंदाज दर्शन पवार व विशाल चौधरी, उत्कृष्ट गोलंदाज रितेश हिवरकर व निर्भय घुगे, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक अंश लोणकलकर, स्वामी खंबायते, उत्कृष्ट देहबोली हिमांशु चौधरी व अर्थव पांढरे, उत्कृष्ट परिक्षार्थी पुष्कर बुवा, उदयोमुख खेळाडू आर्यन पाटील याला चषक, बट, ग्लोज दिले. तर समर कॅम्प मधील बेस्ट ट्रेनी रोहन चौधरी याचा चषक, बट, ग्लोजसह हेल्मट संपूर्ण किट देण्यात आले.

# स्वप्नील राठोड यांना बडतर्फ करण्याची मागणी

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**चाळीसगाव** प्रतिनिधी

धाराशिव येथे दि १४ मे रोजी छत्रपती संभाजी महाराजांची जयंती मिरवणूक शंभू प्रेमींच्या वतीने शांतपणे सुरु असताना कुठलाही गोंधळ न घालता मोठ्या उत्सहात जयंतीची मिरवणूक सुरू होती. मिरवणुकीत सहभागी झालेल्या शंभू प्रेमींवर कुठलाही गुन्हा नसताना पोलीसानी अमानुष लाठीचार्ज करून निरपराध शंभु प्रेमींना झोडपून काढल्याने त्यात अनेक शंभूप्रेमी जखमी झाले असून हा शिवशंभू बांधवांवर अन्याय झाला असून निरपराध शिवशंभू बांधवांवर झालेल्या लाटी हल्ल्याला जबाबदार धरून डी वाय एस पी स्वप्निल राठोड यांना ४८ तासात बडतर्फ करा अन्यथा चाळीसगावात मोठे उग्र आंदोलन करण्याचा इशारा शिवशंभू प्रेमी संघटनेच्या वतीने मुख्यमंत्री यांना तहसीलदार द्वारा दि १७ रोजी निवेदन देण्यात आले आहे, यावेळी घोषणानी तहसील परिसर दणाणून गेला होता.

सदर मागणीची तात्काळ दखल न घेतल्यास कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्यास सर्वस्वी शासन व प्रशासन जबाबदार



राहणार असल्याचा इशारा यावेळी देण्यात आला आहे. डीवायएसपी स्वप्नील राठोड यांना बडतर्फ करण्याच्या घोषणानी तहसील परिसर दणाणून गेला होता, निवेदनाच्या प्रत अपर पोलीस अधीक्षक भाग चाळीसगाव, सहा पोलीस अधीक्षक चाळीसगाव यांना पाठविण्यात आल्या आहेत.

निवेदनावर शिवशंभु प्रेमी संघटनेचे गणेश पवार, लक्ष्मण शिरसाठ, प्रा चंद्रकांत ठाकरे, राजेंद्र पाटील, खुशाल पाटील, प्रदीप मराठे, ज्ञानेश्वर कोल्हे, प्रदीप देशमुख, मुकुंद पवार, पी एन पाटील, ज्ञानेश्वर सोनार, भरत नवले, प्रवीण पाटील, सुधीर पाटील, दीपक देशमुख, किरण पवार, दिलीप बिराजदार, विनोद पाटील, सुनील चव्हाण, अविनाश काकडे, मंगेश वाबळे, शिवाजी गवळी, मनोज भोसले, महेंद्र पाटील, गोपाल पाटील, विजय देशमुख, मनोहर सूर्यवंशी, आबासाहेब सोनवणे, संभाजी सोनवणे, कारभारी बनकर, अण्णासाहेब धुमाळ, बाळासाहेब बारकू पाटील आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.


**मध्य रेल्वे**

भुसावळ विभाग

**ई-निविदा निविदा मागविण्याची सूचना.**

निविदा क्रमांक BSL-L-W-T-38-2024, 1) **कामाचे नाव:** भुसावळ विभागात स्थापित केल्या जाणाऱ्या २४५ ज्ञथ ग्रिड जोडलेल्या रूफटॉप सोलर फोटो-व्होल्टेइक सिस्टीमचा पुरवठा, स्थापना, चाचणी आणि कार्यान्वित करणे. २) **अंदाजे किंमत: १,४६,४१,४४५.** ३) निविदा बंद करण्याची अंतिम तारीख आणि **वेळ: १३.०५.२०२४ १५.०० वाजता.** ४) वेबसाइट तपशील https://www.ireps.gov.in

**AK/BSL-07**

**DOWNLOAD UTS APP FOR TICKETS**


**Chaing In Name**

I have changed my name from **YASMEEN SHAIKH RAEES AHMED SHAIKH** to **YASMIN RAEES SHAIKH**

**जाहिर नोटीस** — **ॲड.गिरीश सी.कटयारे**

**धरणगांव येथील तहसिलदार साहेब यांच्या न्यायालयात**

**अर्ज नं. /२०२४ निशाणी**

**अर्जदार :-** धर्मराज संभाजी सोनवणे

**//विरुध्द//**

सहाय्यक गट विकास अधिकारी पं.स.धरणगाव ..... **सा.वाला**

**अर्ज:- जन्म मृत्यू अधिनियम १९६९ चे कलम १३[३] प्रमाणे मृत्यूची नोंद होणेबाबत**

याव्दारे जाहिर नोटीस देण्यात येते की, अर्जदार यांनी जन्म मृत्यू अकधिनियम १९६९चे कलम १३[३] प्रमाणे मृत्यूची नोंद होणे प्रमाणे, **अर्जदार यांनी त्यांचे काका व काकु यांचा मृत्यू दाखला** मिळणेसाठीचा अर्ज दाखल केलेला आहे. **अर्जदाराची काकु मयत मिराबाई हिरामण सोनवणे हि दि.५/२/२००५ रोजी चांदसर बु।। येथे मयत झालेली आहे.** तसेच अर्जदाराचे **काका मयत हिरामण आबा सोनवणे हे देखिल दि. २/३/१९९३ रोजी चांदसर बु।।** ता. धरणगांव येथे मयत झालेले आहे.त्याअर्थी याव्दारे फर्माविण्यात येते की, सदर अर्जा विरुध्द कारण दाखविण्याकरिता **दिनांक / /२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता** या न्यायालयात व्यक्तीगत किंवा निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे तसे न केल्यास उक्त अर्जाची एकतर्फी सुनावणी होवुन मृत्यू नोंदणी दाखला देण्यात येईल.आज दिनांक / **/२०२४** रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

**सही/-**
**तहसिल कार्यालय,धरणगाव**

**आदेशावरुन**
**सही/-**
**अधिक्षक,**
**तहसिल कार्यालय धरणगाव**

**जाहिर नोटीस** — **ॲड.जे.जे.खान**

**जळगाव येथील मे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर साो. यांचे न्यायालयात**

**दि.कि.अर्ज नं.२८७/२०२४ निशाणी ०७**
**चौकशी तारीख २०/०६/२०२४**

**अर्जदार :-** १] श्रीमती शितल शेखर शिंपी, उ. व. ४२, धंदा घरकाम [२]दुर्गेश शेखर शिंपी, उ. व. १५,धंदा शिक्षण [अर्जदार नं. १ स्वतः करीता व नं. २ ची अपाक म्हणून] [३] प्रांजल शेख शिंपी, उ. व. १९ धंदा शिक्षण [४]पुष्पा उर्फ भारती वसंत शिंपी, उ. व. ७१ धंदा घरकाम, सर्व रा. प्लॉट नं.२७/२, सेंट्रल बँक कॉलनी, एकमुखी दत्त मंदीराजवळ, पिंप्राळा जळगाव ता. जि. जळगाव

**//विरुध्द//**

कुणीही नाही ..... **सा.वाला**

**अर्जः- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ व ३ अन्वये वारस दाखला मिळणेसाठी**

जाहीर नोटीस देण्यात येते कि, अर्जदार हे सरनाम्यात दिलेल्या पत्यावर राहत असून **अर्जदार नं. १यांचे पती, अर्जदार नं. २ व ३ यांचे वडिल तसेच अर्जदार नं. ४ यांचा मुलगा नामे कै.शेखर वसंत शिंपी हे दि. ०१/०४/२०२१ रोजी कोरोनाच्या काळात** रोगाचा उपचार चालू असतांना जळगांव येथील सिव्हील हॉस्पटलमध्ये मयत झालेले आहेत. **मयत कै. शेखर वसंत शिंपी यांच्या** मृत्यूपश्चात अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यांचे शिवाय मयतास कोणीही कायदेशीर वारस नाहीत. **मयत कै शेखर वसंत शिंपी यांना अर्जदार नं. १ ते ४ हेच** कायदेशिर वारस असल्याने त्यांच्या मृत्युनंतर अर्जदारांना शाकीय निमशासकीय लाभ तसेच इतर क्षेत्रातील मिळणारे लाभ व सुविधा मिळणेकामी वारस दाखल्याची आवश्यकता असल्यामुळे सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.सदर अर्जदार हे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्या आणि उक्त लेखा वरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरील अर्जदारांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबित झाल्यास सदर अर्जदार यांना **मयत कै. शेखर वसंत शिंपी** यांचे वारस दाखला देण्यात येईल.आज दिनांक **०२/०५/२०२४** रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

कोर्टाचा शिक्का

**हुकूमावरुन**
**सही/-**
**प्र.सहा.अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व स्तर जळगाव**

## निधन वार्ता

### महेश कैलास धनके



**रावेर –** रसलपुर तालुका रावेर येथील रहिवाशी महेश कैलास धनके यांचे दिनांक १७/०५/२०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा दिनांक १८/५/२०२४ रोजी सकाळी ठीक ८.३० वाजेला राहते घर रसलपुर येथुन निघाली. स्व महेश कैलास धनके हे श्री बाळू लक्ष्मण धनके व गणेश लक्ष्मण धनके यांचे पुतणे होते.

### रतन शामराव बडगुजर



**मुक्ताईनगर –** येथील रहिवासी सेवानिवृत्त एसटी वाहक रतन शामराव बडगुजर वय ७३ वर्ष यांचे १४ मे रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांचे पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते किशोर बडगुजर व प्रशांत बडगुजर यांचे वडील होत.

### शालिग्राम गंभीर पाटील



**मुक्ताईनगर –** मा. नगरसेवक डॉ प्रदीप शालिग्राम पाटील संजीवनी हॉस्पिटल मुक्ताईनगर यांचे वडील स्व. शालिग्राम गंभीर पाटील यांना दि १८/०५/२०२४ रोजी देवज्ञा झाली. त्यांची अंतयात्रा संध्याकाळी ७ वा तासखेडा तालुका रावेर राहत्या घरून निघणार आहे.

पान १ वरून

## शिंदेंना मुख्यमंत्री करण्यास....

सोपवलं असतं तर भविष्यात पक्षात फूट पडली असती, असा मोठा दावा शरद पवार यांनी केला.

२०१४ मध्येच महाविकास आघाडी सरकार स्थापन करण्याचा प्रयत्न होता, असा मोठा दावा शरद पवार यांनी केला. भाजप आणि शिवसेनेत अंतर पाडण्याचा आमचा प्रयत्न होता. शिवसेना भाजपसोबत गेली आणि २०१४ मध्ये महाविकास आघाडीचा आमचा प्रयोग फसला, असंदेखील शरद पवार म्हणाले.

प्रफुल्ल पटेल २००४ पासूनच भाजपसोबत जाण्यासाठी आग्रही होते. काँग्रेसबरोबर जाण्यास प्रफुल्ल पटेल यांनी विरोध केला होता. तरीदेखील युपीए सरकारमध्ये आम्ही पटेल यांना केंद्रीय मंत्रीपद दिलं. २००४च्या निवडणुकीच्या आधीपासून प्रफुल्लभाई सारखं सांगायचे की, या निवडणुकीत आपले पक्ष टिकणार नाहीत. वाजपेयींना पर्याय नाही. आपण सगळे भाजपमध्ये जाऊ, तासंतास त्यांनी आग्रह केला होता. शेवटी मी नाही म्हणून सांगितलं. तुम्ही जा म्हणून सांगितलं. शेवटी अक्षरश: त्यांच्या डोळ्यांत पाणी आलं, असा मोठा दावा शरद पवार यांनी केला.

काँग्रेसबाहेर पडलेल्या नेत्यांनी स्थापन केलेले छोटे पक्ष विलीन होऊ शकतात. आपला पक्ष विलीन करण्याचा विचार नाही. पुढे हा पर्याय त्याज्य नाही, असं स्पष्टीकरण शरद पवार यांनी दिली.

## भाजपने राममंदिर प्राणप्रतिष्ठेला...

त्यांच्या मित्रपक्षांच्या तसेच काही राजकीय विश्लेषकांच्या मते काँग्रेस नेत्यांनी या कार्यक्रमाला न जाणं चूक मानलं आहे. यावर काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधी यांनी प्रतिक्रिया दिली आहे. प्रियांका गांधी यांनी नुकतीच इंडिया टूडेला मुलाखत दिली. यावेळी त्यांनी राम मंदिरातील प्राणप्रतिष्ठा सोहळ्यावर प्रतिक्रिया दिली.

प्रियांका गांधी म्हणाल्या, तुम्ही प्रत्येक गोष्टीकडे राजकीय दृष्टिकोनातून बघू लागलात तर तुम्ही काहीही बोलू शकता, कसलीही टीका करू शकता, अगदी धर्मावरूनही टीका करू शकता. परंतु, आमच्यासाठी धर्म हा राजकीय मुद्दा नाही. धर्म हा प्रत्येक भारतीयांच्या मनातला मुद्दा आहे. राम, कृष्ण किंवा भगवान शिव हे प्रत्येक भारतीयाच्या मनात आहेत. धर्म असो अथवा आस्था असो, तिचा आदर व्हायला हवा. प्रत्येक भारतीयांच्या मनातील आस्थेचा आदर व्हायला हवा. आम्ही तो आदर करत असतो. राम मंदिरात झालेल्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला न जाणं म्हणजे आमची चूक नव्हती. तुम्ही याकडे राजकीय दृष्टिकोनातून बघताय किंवा भाजपाच्या दृष्टिकोनातून बघताय, म्हणून तुम्हाला तसं वाटत असेल.

प्रियांका गांधी म्हणाल्या, भाजपाने आम्हाला प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचं निमंत्रण दिलं होतं. आम्ही त्या निमंत्रणाचा आदरच करतो. आम्ही आमच्या अधिकृत निवेदनात ते स्पष्ट केलं होतं. कारण जिथे आस्था आहे तिथे आम्ही आदर करतो. कारण आम्ही या देशाचे आणि या देशातील जनतेचे प्रतिनिधी आहोत. परंतु, मला नाही वाटत की आम्ही त्या कार्यक्रमाला न जाऊन काही चूक केली असेल. त्या कार्यक्रमाला त्यांनी राजकीय कार्यक्रम बनवलं होतं.

## मोबाईल लांबविणाऱ्या दोन....

जळगाव) व शंतनु प्रकाश भालेराव (रा. कुऱ्हाड, ता. पाचोरा) यांचे देखील मोबाईल चोरीस गेल्याचे उघड झाले. त्यांनी लागलीच पाचोरा पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दिली. त्यानुसार गुन्हे शोध पथकातील पोहेकॉ राहुल शिंपी, पोकों योगेश सुरेश पाटील, योगेश पाटील यांनी सीसीटीव्ही फुटेज व गुन्हयाचे तांत्रिक विश्लेषणाच्या आधारावर चोरट्यांचा शोध घेत होते. रिक्षातून घेतले मोबाईल चोरट्यांना ताब्यात चोरटे हे बसस्थानक परीसरात रिक्षात असून फिरत असल्याची माहिती मिळताच नाजीम मोहम्मद पठाण व अमजद रशीद शेख या दोघांना (एमएच १९, सीडबल्यू ११४२) क्रमांकाच्या रिक्षातून ताब्यात घेतले. त्यांच्याकडून ३२ हजार रुपये किंमतीचे तीन चोरलेले मोबाईल जप्त करण्यात आले आहे. तसेच गुन्हयात वापरलेली रिक्षा देखील हस्तगत करण्यात आलेली आहे. पुढील तपास पोहेकों राहुल शिंपी हे करीत आहेत.

## एरंडोलात दीड लाख बीटी...

पाकिटे तालुक्यात पुरविण्यात आली आहेत. आतापर्यंत जिल्ह्यात १० लाख कापूस बियाणे पाकिटे दाखल झालेली आहेत. ती लवकरच तालुकास्तरावर वितरित करण्यात येणार आहेत त्यामुळे कापूस बियाण्याची टंचाई राहणार नाही असा दावा कृषी विभागाने केला आहे.

एरंडोल तालुक्यासाठी १३०१० मॅट्रिक टन रासायनिक खत साठा मागणी केलेली असून ११ हजार ३८० मेट्रिक टन रासायनिक खत खासाठा मंजूर आहे १९ मे २०२४ अखेर ६ हजार ९०७ मॅट्रिक टन रासायनिक खत साठा शिल्लक असून त्यापैकी २५३४ मॅट्रिक टन युरिया हे रासायनिक खत गटातील २५ विक्रेत्यांकडे शिल्लक आहे रासायनिक खताचा पुरेसा साठा शिल्लक असून रासायनिक खताची टंचाई भासणार नाही अशी ग्वाही देण्यात आली आहे.

कपाशीचे तन नाशक संवेदनशील जसे एच टीबीटी हे पर्यावरण मानव व प्राणीमात्रास हानिकारक असल्याने परवानगी दिलेली नाही व विक्री कायद्याने गुन्हा ठरविण्यात आला आहे. एरंडोल तालुक्यामध्ये असे एचटीबीटी बियाणे सापडल्यास त्यांच्यावर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. अशी माहिती कृषी विभागातर्फे देण्यात आली आहे.

असे एसटीबीटी बियाणे अनधिकृत व्यक्तींमार्फत कुठल्याही प्रकारचे बिल न घेता विक्री होऊ शकते अशा बियाण्यापासून उत्पादनाची कुठल्याही प्रकारची हमी नाही. त्यामुळे शेतकऱ्याच्या पिकाचे नुकसान झाल्यास तक्रार देखील दाखल होऊ शकत नाही म्हणून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊ शकते. याकरिता शेतकऱ्यांनी कुठल्याही अनाधिकृत व्यक्तीमार्फत अशा प्रकारची बंदी असलेले कपाशी बियाणे खरेदी करू नये असे कळविण्यात आले आहे.

तसेच अशा प्रकारचे असलेले कपाशी बियाणे विक्री होत असल्यास कृषी अधिकारी पंचायत समिती एरंडोल तसेच तालुका कृषी अधिकारी एरंडोल यांना तात्काळ अवगत करण्यात यावे असे आवाहन करण्यात आले आहे शेतकरी बांधवांनी कुठल्या प्रकारचे बियाणे हे अधिकृत परवानाधारक विक्रेते यांच्याकडूनच पक्के बिल प्राप्त करूनच खरेदी करावे जेणेकरून आपली फसवणूक होणार नाही याची काळजी घेण्यात यावी.

कोणीही विक्रेता जादा दराने बियाण्याची विक्री करणार नाही व काळाबाजार करणार नाही याबाबत विक्रेत्यांना सक्त सूचना देण्यात आले आहेत एरंडोल तालुक्यामधील प्रत्येक विक्री केंद्रावर कृषी विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आलेली असून शेतकऱ्यांना त्यांच्या समक्ष विक्री करणार आहेत. तालुकास्तरावर पाच भरारी पथक स्थापन करण्यात आलेले आहेत. त्यात तालुका कृषी अधिकारी ,कृषी अधिकारी पंचायत समिती, मंडळ कृषी अधिकारी कासोदा, मंडळ कृषी अधिकारी एरंडोल, वजन मापे निरीक्षक यांचा समावेश आहे. तरी कृषी निविष्ठा बियाणे ,खते व कीटकनाशक बाबत काही एक तक्रार असल्यास कृषी अधिकारी पंचायत समिती एरंडोल तसेच तालुका अधिकारी एरंडोल यांना तात्काळ कळविण्यात यावे असे आवाहन करण्यात आले आहे.

**सध्या स्थितीत वाढते तापमान लक्षात घेऊन कोणीही शेतकरी कापसाची लागवड करणार नाही एक जून नंतर बागायती कापूस लागवड करावी.**

**– बी.एस. मोरे**
**कृषी अधिकारी पं. स. एरंडोल**

## जंगलातील प्राण्यांच्या दर्शनासाठी....

करत असताना प्राण्यांची गणना केली जाते.

काही ठिकाणी ट्रॅप कॅमेराद्वारे सुद्धा गणना केली जाते. नवखे निसर्ग प्रेमी, निसर्ग अभ्यासक, विध्यार्थी यानाही जंगलातील थरार अनुभवता येईल. यावल वन विभागात अस्वल, बिबट, सांबर, वाघ, चितळ, रेडकी, चौशिंगा, सायळ यासह विविध पक्षी, सरपटणारे प्राणी व तसेच दुर्मिळ प्राणी सुद्धा नजरेस पडतात. सदर या कार्यक्रमाचे नियोजन वनविभागातील प्राणी गणना ही धुळे प्रादेशिक वन विभागाच्या वनसंरक्षक निनू सोमराज, यावल वनविभागाचे उपवनसंरक्षक जमीर एम शेख, सहाय्यक वनसंरक्षक प्रथमेश हाडपे यांचे मार्गदर्शनाखाली सर्व वनविभागाचे यावल वनपरिक्षेत्राचे अधिकारी स्वप्नील फंटागरे, पश्चिम क्षेत्राचे वनपरिक्षेत्र सुनिल भिलावे, रावेर विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी अजय बावणे, चोपडा वनक्षेत्राचे वनपरिक्षेत्र अधिकारी वनपाल वनरक्षक व वनमजूर काम करणार आहेत. यामुळे वनप्रेमीमध्ये आनंद व्यक्त होत आहे.

## जैन इरिगेशनचा वार्षिक एकत्रित....

वर्ष २०२३-२४ साठी स्टॅण्डअलोन निव्वळ नफा ४१.२ टक्क्यांनी वाढून तो ५५.५ कोटी झाला.

**ऑर्डर बुक :** सध्या कंपनीच्या हातात एकत्रित आधारावर, १९२५ रुपये कोटीच्या ऑर्डर्स आहेत. ज्यामध्ये हाय-टेक ॲग्री इनपुट उत्पादन व्यवसायाच्या ३८३ कोटी रुपयांच्या, प्लास्टिक विभागाच्या ४७१ कोटी आणि कृषी प्रक्रिया (ॲग्रो प्रोसेसिंग) विभागाच्या १०७१ कोटी रुपयांच्या ऑर्डर्स समाविष्ट आहेत.

कंपनीचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक अनिल जैन म्हणाले की, (क्लायमेट चेंज) हवामान बदलाला भारतासह संपूर्ण जग सामोरे जात आहे. कृषी क्षेत्रात त्यामुळे अनेक आव्हाने उभी ठाकली आहेत. विशेषत: मूल्यवर्धित शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना याचा फटका बसत आहे. या आव्हानांना सामोरे जात कंपनीने किरकोळ व्यवसायात २५ टक्क्यांची भरीव वाढ केली आहे. कंपनीने प्रकल्प-आधारित व्यवसाय धोरणात्मकरित्या कमी केला आणि किरकोळ आणि निर्यात बाजारांवर लक्ष केंद्रीत केले ज्यामुळे चांगला नफा कमावला आहे आणि महसूल मिश्रण (रेव्हेन्यू मिक्स) पूर्णपणे बदलले आहे. कापसासारख्या महत्त्वाच्या वस्तूंच्या बाजारभावात घसरण झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत त्याचा दुष्परिणाम दिसून येतो.

लोकशाही
जळगाव next
५
जळगाव, सोमवार, दि.२० मे २०२४
epaper.lokshahilive.com

## आद्य शंकराचार्य जयंतीनिमित्त धार्मिक कार्यक्रम

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**शेंदुर्णी ता. जामनेर** प्रतिनिधी



हिंदु धर्माच्या प्रचार आणि प्रसारासाठी आद्य शंकराचार्य यांनी खुप मोठा त्याग आणि कार्य केले आहे. चार विभागात सध्या शंकराचार्य यांच्या विचारांमुळे धार्मिक कार्य केले जात असुन त्यांच्या कार्याचा त्यागाचा आदर्श आपल्या **(पान २ वर)**

## महत्वाचे

### गोंडस बाळाला जन्म दिला अन सोडले प्राण

**जळगाव –** तालुक्यातील शिरसोली येथील माहेरवाशीनीने एका गोंडस मुलाला जन्म दिल्यानंतर तिचा मृत्यू झाल्याची घटना दि.१७ मे रोजी संध्याकाळी ७.३० वाजेच्या सुमारास घडली. या घटनेमुळे शिरसोली गावावर शोककळा पसरली होती. आरती किशोर बोडखे (वय २५) रा. रहिमाबाद, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर असे मयत महिलेचे नाव आहे. महिलेचे पती किशोर हे एका कंपनीत काम करुन आपला उदरनिर्वाह भागवतात. आरती गर्भवती असल्याने तिच्या पोटात दुखू लागल्याने तिला रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. सिझेरियन करुन प्रसूती केल्यानंतर महिलेला झटके आल्याने आरतीचा मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात सासू, सासरे, पती, व नुकतेच जन्मलेले बाळ असा परिवार आहे.

### दिव्यांग तरुणीचा विनयभंग करणाऱ्या एकाला अटक

**रावेर –** घरात एकट्या असलेल्या तरुणीच्या घरात शिरुन तिच्यासोबत अश्लिल वर्तन करीत विनयभंग केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी रावेर पोलीस ठाण्यात संजू हैदर तडवी याच्याविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच संशयिताला पोलिसांनी अटक केली आहे. रावेर तालुक्यातील एका गावात दिव्यांग तरुणी वास्तव्यास आहे. शनिवारी रात्रीच्या सुमारास ही तरुणी घरात एकटी असतांना संशयित संजू तडवी याने खिडकीतून तरुणीच्या घरात प्रवेश केला. तसेच तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करीत तिला धमकी दिली. या प्रकरणी या युवतीने रावेर पोलीस स्टेशनला सदर इसमाविरुध्द विरूध्द विनयभंग केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. संशयिताला पोलीसांनी अटक केली असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक डॉ. विशाल जयस्वाल यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरिक्षक घनश्याम तांबे करीत आहेत.

### सत्तर वर्षीय वृद्धाकडून साठ वर्षीय वृद्धेचा विनयभंग

**जळगाव –** शहरातील समता नगर येथील एका सत्तर वर्षीय वृद्धाकडून साठ वर्षीय वृद्ध महिलेला धक्का देऊन विनयभंग केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी रामानंदनगर पोलीस ठाण्यात विनयभंग करणाऱ्या वृद्धावर गुन्हा दाखल करण्यात आला. शहरातील एका परिसरात साठ वर्षीय वृद्ध महिला ह्या आपल्या परिवारासह वास्तव्याला आहे. त्या भागातच राहणारे नारायण गोविंदा इंगळे (वय ७०) हे देखील वास्तव्यास आहे. शुक्रवार दि. १७ मे रोजी सकाळी १० वाजता त्यांच्या अंगणात भाजीपाला घेण्यासाठी आले होते. त्यावेळी संशयित नारायण गोविंदा इंगळे यांनी महिलेला धक्का दिला. या कारणावरून महिलेने रामानंद नगर पोलीस ठाण्यात धाव घेतली. त्यानुसार त्यांनी दिलेल्या तक्रारीवरून सायंकाळी रामानंदनगर पोलीस ठाण्यात संशयित आरोपी नारायण इंगळे यांच्या विरोधात विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल इरफान मलिक करीत आहे.

# चिनावलला संचारबंदीच्या दुसऱ्या दिवशीही गावात शुकशुकाट

**घटनेच्या तपासासाठी पोलिस अलर्ट मोडवर : रात्रीपासून चौकशीला सुरुवात : गुरांच्या चारापाणीसाठी तासभर सूट**

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**चिनावल** प्रतिनिधी



दि १७ च्या रात्री चिनावल येथे झालेल्या दगडफेकी नतंर येथे सुरू असलेल्या ३ दिवसांच्या संचारबंदीच्या दुसऱ्या दिवशी कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. दिवसभर सर्वत्र शुकशुकाट होता. मात्र या स्थितीत पोलिस मात्र घटनेच्या तपासासाठी अलर्ट मोडवर आले आहेत.

दि १७ शुक्रवारी किरकोळ कारणावरून झालेल्या चिनावल येथिल प्रचंड दगडफेकीत पळापळ, मोटरसायकल, मोठ्या चारचाकी गाड्या तसेच महिलांचा विनयभंग अशा पद्धतीने घटना घडल्याचे दोन वेगवेगळ्या फिर्यादित नमूद झाले. सदर घटनेवरून गावातील परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये, म्हणून प्रशासनाने दि १७ चे मध्यरात्री नतंर संचारबंदी दि २० चे मध्यरात्री पर्यंत लागू केली आहे. दि १८ व १९ रोजी गावात सर्वत्र शुकशुकाट होता. **(पान २ वर)**

### यहाँ पे सब शांती शांती है

परवा रात्री झालेल्या दगडफेक नतंर परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये म्हणून मध्यरात्री नतंर चिनावल येथे तब्बल ३ दिवस संचारबंदी जाहीर केली आहे. यामुळे दि १८ रोजी सकाळी पोलिस प्रशासनाच्या कडक अंमलबजावणीत गुरे पालक, दुग्ध व्यवसायीक, शेतमजूर यांची मोठी तारांबळ उडाली. अनवधानाने बाहेर पडलेल्या अनेक जणांना पोलिसी खाक्यांना सामोरे जावे लागले. या मुळे काल दिवसभरात चिनावलात एक प्रकारे स्मशान शांतता होती. त्यामुळे गावात 'यहाँ पे सब शांती शांती है'ची अनुभूती गावकऱ्यांना आली.

### कोंडला कोंडला देव देऊळी कोंडला

चिनावलच्या या दंगलीची झळ अक्षरशः देवालाही सोसावी लागत आहे. गावात श्रीमद् भागवत पारायण कथा सुरू आहे. मात्र संचारबंदीमुळे सकाळची ककडा आरती, पारायण, हरिपाठ व किर्तन बंदद्वार करण्यात येत असल्याने भाविकांच्या श्रद्धेला ठेच पोहचली आहे. तसेच गावातील मंदीरे ही आज बंदच होती. या मुळे भाविकांना अरे कोंडला कोंडला देव देऊळी कोंडला या जनाबाईच्या अभंगांची प्रत्यक्ष प्रचीती आली.

## अल्पवयीन मुलीवर अतिप्रसंग करणाऱ्याला सश्रम कारावास

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**अमळनेर** प्रतिनिधी

आईवडील शेतात गेल्यावर अल्पवयीन मुलीवर अतिप्रसंग करणाऱ्या धीरज रवींद्र फुगारे (वय २०, रा. गोरगावले, ता. चोपडा) या तरूणास अमळनेर जिल्हा सत्र न्यायालयाने १५ वर्षाचा सश्रम कारावास आणि २५ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.

अल्पवयीन मुलीचे आई, वडील व आजोबा येथे शेतात तूर कापण्यासाठी गेले असता, अल्पवयीन मुलगी घरात एकटी होती. दरम्यान, धिरज फुगारे या तरुणाने मुलीच्या घरात प्रवेश करीत तिला तू मला फोन का लावत नाही अशी विचारणा केली. तसेच त्या मुलीसोबत अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केल्याची घटना दि. ६ जानेवारी २०२२ रोजी घडली होती. यावेळी तरणाने मुलीला मारहाण केल्यामुळे ती अल्पवयीन मुलगी जखमी देखील झाली. सायंकाळी मुलीचे आई वडील घरी आले असता मुलीने घडलेला प्रकार सांगितला. मुलीला उपचारासाठी चोपडा उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. दवाखाण्यातच **(पान २ वर)**

### साक्षीदारांची साक्ष ठरली महत्वपूर्ण

हा खटला अमळनेर जिल्हा सत्र न्यायालयात सुरू होता. खटल्यात ११ साक्षीदार तपासले सरकारी वकील ड. शशिकांत पाटील यांनी यात ११ साक्षीदार तपासले. पीडिता, तिची आई, डॉ. गुरुप्रसाद, डॉ. पंकज पाटील, डॉ. पवन पाटील यांची साक्ष ग्राह्य धरून न्या. पी. आर. चौधरी यांनी आरोपी धीरज फुगारे याला शिक्षा सुनावली.

## पाल वनोद्यानातील पुरातन नागझिरी कुंडाची साफसफाई

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पाल ता. रावेर** प्रतिनिधी



भारत हा निसर्ग सपंन्न देश आहे. पाणी आणि जलसस्कृंती फार पूर्वीपासून इथला समाज जपत आला आहे. आजवर पाण्याचे नियोजन, सवंर्धन व व्यवस्थापन करण्यास त्याचा उपयोग होऊ शकतो.

पाल सूकी नदी किनारी ७०० वर्ष पूरातन नागझिरी कूडांच्या गौमूखातून शेकडो गावकऱ्यांनी आपली तहान भागवली. या ठिकाणी भूमीत आढळणारे थडं पाण्याचे झरे म्हणजे, निसर्ग शक्तीचा अनोखा चमत्कार आहे. याची निर्मिती ७०० वर्षांपूर्वी झाली. अशी माहिती मिळते. पूर्वी सकाळी या नागझिरी कूडांतून परिसरातील महिला पाणी भरत असल्याची माहिती गावकरी देतात. कूडांचे वशिष्ठ असे की एका बाजूस उतरती फरसबंदी असे व आतील बांधकाम पक्के करीत. अर्ध्या भिंतीपर्यंत पक्की चुनेबंदी करून वर वनस्पतीचा दाट थर देत व कोठेही पाणी मुरणार नाही, याची काळजी घेत वरच्या गौमूखातून सांडपाणी खालच्या डोहात सोडण्याची व्यवस्था असे, आणि मग हे सांडपाणी बंदिस्त गटारातून सूकी नदीत सोडण्याची व्यवस्था त्या काळी करण्यात आली होती. यात स्नान केल्याने त्वचारोग बरे होणे अथवा पाप नष्ट होते अशी लोकांची श्रद्धा आहे.

सुमारे सातशे वर्षांपूर्वी या स्थळी मंदिराची उभारणी झाल्याचे दिसते. या कूडांजवळ किल्ला, हनूमान मदिंर, हत्तीवाडा, शिवमदिंर, जामा मस्जिद, राणी महल असल्याने त्या काळी अनेकाचीं तहान भागवणार्या कूडांचे. **(पान २ वर)**

## महेश पाटील यांची शिरसाड वाचनालयाला भेट



**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मनवेल ता. यावल** प्रतिनिधी

शिरसाड गावाचे रहिवासी तथा स्वतःच्या कर्तृत्वावर पुण्यासारख्या मोठ्या शहरात स्वतःची स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन करणारी नामांकित शाश्वत अकॅडमी उभी करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे महेश सुभाष पाटील यांनी काल शिरसाड येथील कै.सौ. कमलाबाई एकनाथराव पाटील सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय येथे सदिच्छा भेट दिली व तेथील विद्यार्थ्यांना **(पान २ वर)**

## पोलिस निरीक्षक सचिन सानप व त्यांच्या टीमचा पोलिस अधीक्षकंच्या हस्ते गौरव

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**शेंदुर्णी** प्रतिनिधी



पहुर पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सचिन सानप तसेच शेंदुर्णी दुर क्षेत्राचे पोउनि. दिलीप पाटील यांच्या सह पोलीस कर्मचारी यांचा उत्कृष्ट तपास करत तात्काळ आरोपींना वेगवेगळ्या गुन्ह्यात अटक करुन कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जळगांव चे पोलिस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

पोलिस निरीक्षक सचिन सानप, पोउनि. दिलीप पाटील, संजय बनसोडे, सहा. फौ. शशिकांत पाटील, सहा. फौ. प्रकाश पाटील, हे. कॉ. प्रशांत विकणारे, पो. कॉ. जिजाबराव कोकणचे, संदिप पाटील, विनोद पाटील, जिवन बंजाराया टीमने पहुर पोलिस स्टेशनच्या हद्दीत घडलेल्या कलम ३०२ घ्या दोन गुन्ह्यातील आरोपींना तात्काळ अटक करुन कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी **(पान २ वर)**

## विकास कामांच्या संथ गतीमुळे दिव्यांग शिवाची तारेवरची कसरत

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पाचोरा** प्रतिनिधी



शहरातील हनुमान नगर भागातील गटारींचे काम गेल्या काही महीन्यांपासुन खोदकाम करून ठेवले असल्याने नागरिकांना जाण्या येण्यास अडचणी निर्माण होत या. विशेष या भागात राहणार्या दिव्यांग शिवा ठाकुर यास घरी येणे आणी गावात जाण्यासाठी तारेवरील कसरत करावी लागत आहे.

याबाबत प्राप्त माहीती अशी की, शहरात सर्वत्र विकास कामे सुरू आहेत. शहरातील हनुमान नगर भागातही विकास **(पान २ वर)**

## पिंपळगावच्या पोलिसांचा अधीक्षकांच्याहस्ते गौरव

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**शिंदाड** प्रतिनिधी




पाचोरा तालुक्यातील पिंपळगाव पोलीस स्टेशनला नवेने रुजू झालेले शिस्तप्रिय साहाय्यक पोलीस निरीक्षक प्रकाश काळे व उपनिरीक्षक अमोल पवार यांनी ३०२ चा गुन्हाची २४ तासात यशस्वी उकल केल्याबद्दल जिल्हा जिल्हा पोलीस अधीक्षक महेश्वर रेड्डी यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रकाश काळे यांच्या मार्गदर्शनाखाली या गुन्ह्याची यशस्वी उकल केलेबद्दल पीएसआय अमोल पवार, पो. उपनिरीक्षक परशुराम दळवी, पोलीस कर्मचारी रवींद्रसिग पाटील, शातीलाल पगारे, मुकेश लोकरे, योगिता चौधरी, जितेद्र पाटील, अभिजीत निकम प्रशात पाटील, पंकज सोनवणे, दिपक आहिरे व अमोल पाटील यांच्या पथकाने करण्यात आला.

वरील गुन्हा २४ तासात सिद्ध करीत, आरोपीला अटक केल्याबद्दल जिल्हा पोलीस अधीक्षक महेशवर रेड्डी यांच्या हस्ते शुक्रवारी १७ तारखेला जळगाव येथे साहाय्यक पोलीस निरीक्षक प्रकाश काळे व सहकाऱ्यांचा सन्मानपत्र देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. त्यांच्या या कार्याचे पिंपळगाव हरे. परिसरात कौतुक होत आहे.

## वाहनाच्या धडकेत मोटरसायकलस्वार जागीच ठार

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पाचोरा** प्रतिनिधी





तालुक्यातील अंतुर्ली फाट्याजवळ अज्ञात वाहनाच्या धडकेत मोटरसायकल स्वाराचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली असुन घटनास्थळावरून अज्ञात वाहन पसार झाले आहे.


पाचोरा ते भडगाव रोडवर असलेल्या अंतुर्ली फाट्याजवळ पाचोऱ्याहुन भडगावच्या दिशेने मोटरसायकल क्रं. एम. एच. ४१ बी. बी. ०४५१ वरुन जाणाऱ्या यशवंत भगवान माळी (वय – २३) रा. मांदुर्णे ता. चाळीसगाव यांना भडगाव हुन पाचोऱ्याच्या दिशेने येणाऱ्या अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. या धडकेत यशवंत माळी यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होवुन त्यांचा जागीच मृत्यू झाला आहे.

दरम्यान घटनेचे गांभीर्य लक्षात घेता धडक देणारे अज्ञात वाहन अंतुर्ली गावाच्या दिशेने पसार झाले आहे. घटनेची माहिती मिळताच पाचोरा पोलिस स्टेशनचे पोलिस कर्मचारी घटनास्थळी दाखल होवून यशवंत माळी यांचा मृतदेह पाचोरा ग्रामीण **(पान २ वर)**

# चुंचाळ्यात गुरुशिष्य पुण्यतिथीचा अनोखा सोहळा

**नऊ क्विंटल आंब्याचा रस आणि अकरा क्विंटल खापरीवरील पुरणपोळीचा होणार महाप्रसाद**

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मनवेल ता. यावल** प्रतिनिधी



चुंचाळे येथे गुरु रघुनाथ बाबा व शिष्य वासुदेव बाबा हे एकाच दिवशी वैशाख शुध्द बारसला समाधिस्थान झाले या गुरु व शिष्य यांच्या अनोखा पुण्यतिथी सोहळा आज सोमवारी दि. २० रोजी श्री समर्थ वासुदेव बाबा दरबार येथे होईल.

श्री सुकनाथ बाबा हे श्री क्षेत्र काशी येथुन चुंचाळे येथे आले. येथे त्यांनी अखंड बारा वर्ष तप केला. म्हणून चुंचाळे हे गाव सुकनाथ बाबा यांची तपोभुमी म्हणून ओळखली जाते. तसेच त्याचे चिरंजिव रघुनाथ बाबा यांचा जन्म याच भुमीत झाला, म्हणून हे गाव त्यांची जन्मभुमी म्हणूनओळखली जाते व वासुदेव बाबा यांची कर्मभुमी या नावाने हे गाव प्रसिद्ध आहे. चुंचाळे या पावन नगरीत महाराष्ट्रासह गुजरात, एम. पी व परिसरातील गावामध्ये देखील यांचे शिष्यमंडळी आहे.

याच पिता पुत्राच्या एकाच मंदीरात समाधीचे स्थान वर्डी ता. चोपडा येथे आहे. सुकनाथ बाबा यांनी १९३५ मध्ये तर रघुनाथ बाबा १९७९ मध्ये वर्डी ता. चोपडा या गावात समाधिस्थ झाले त्यांचे शिष्य वासुदेव बाबा हे गुरु रघुनाथ बाबांन बरोबर १९८० मध्ये चुंचाळे येथे बालपण अवस्थेत घर शिरपुर सोडुन बाबाची आणि पुरातन असलेली समाधी यांची स्नान, पुजापाट, आरती करीत मंदिरात भक्ती केली.

वासुदेव बाबांनी गावकरी आणि शिष्यमंडळीच्या सहकार्याने गावात मंदिर बांधण्यास प्रारंभ केला आणि आज हे येवढे मोठे भले मंदिर उभारले. मंदिरात २१ किलो चांदीच्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठा सन २००० मध्ये करण्यात आली. या मंदिराचा कळस ६१ फुट उंचीचा आहे.

**(पान २ वर)**

लोकसभा निवडणूक 2024

# लोकोत्सव

लोकशाही

epaper.lokshahilive.com

जळगाव, सोमवार, दि.२० मे २०२४

# पाकव्याप्त काश्मीर सहा महिन्यांत भारताचा भाग असेल!

## योगी आदित्यनाथ यांचा ठाम विश्वास

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पालघर** प्रतिनिधी

महाराष्ट्रात एकूण पाच टप्प्यात निवडणुका पार पडणार असून त्यातील शेवटच्या टप्प्यासाठी उद्या मतदान होणार आहे. यात मुंबईतील सहा मतदारसंघांसह पालघरचाही समावेश आहे. काल पालघरमध्ये उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी प्रचारसभा घेतली. या सभेत आदित्यनाथ यांनी पाकव्याप्त काश्मीरबद्दल मोठे विधान करत एकच खळबळ उडवून दिली आहे.

आदित्यनाथ म्हणाले, जो आमच्यावर हल्ले करतो त्याची आम्ही पूजा करणार नाही. जर कोणी आमच्या लोकांना मारले तर आम्ही देखील त्यांच्यावर प्रतिहल्ला करू. काँग्रेसच्यावेळी पाकिस्तानातून हल्ले केले जात होते. काँग्रेसला प्रश्न विचारल्यावर ते सांगायचे की दहशतवादी सीमापार आहेत. असे सांगून कसे चालेल. नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यावर हे चित्र बदलले आणि आता पाकिस्तानला वेळोवेळी चोख प्रत्युत्तर देण्यात आले. आता पाकव्याप्त काश्मीर वाचवणंही पाकिस्तानला कठीण जात आहे. तुम्ही नरेंद्र मोदींना तिस-यांदा पंतप्रधान करा, पुढच्या ६ महिन्यात पाकव्याप्त काश्मीर भारताचा भाग झाल्याचे तुम्हाला दिसेल. हे करण्यासाठी हिंमत लागते. धाडस असेल तरच हे काम करता येते. मोदी हे काम नक्की करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आमच्यावर नजर रोखून पाहिल्यास आम्ही गप्प राहणार नाही. न घाबरता, न थांबता आणि



खचून न जाता विकासाच्या प्रवासात वाटचाल करणारा हा नवा भारत आहे आणि याचे नेतृत्व खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी करत आहेत. असा नव्या प्रकारचा भारत तुम्हा सर्वांसमोर येत आहे, असेही योगी म्हणाले.

### विकसित भारत हेच ध्येय

मुघल सम्राट औरंगजेबच्या आत्म्याने विरोधी पक्षात प्रवेश केला आहे. त्यांना योग्य जागा दाखवली जाईल. भाजपा केवळ सत्तेसाठी नाही तर विकसित भारत घडवण्यासाठी निवडणूक लढवत आहे. नरेंद्र मोदी पुन्हा एकदा पंतप्रधान होणार आहेत यात शंका नसावी असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# मोदीच हॅटट्रिक करणार!

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीचा निकाल ४ जून रोजी जाहीर होणार असला तरी आपण तिसऱ्यांदा सत्तेत आलो तर पहिल्या शंभर दिवसात काय करणार याचे नियोजन देखील झाले असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या याधीच सांगितले आहे. सचिवालयातील प्रशासकीय अधिकारीही त्यावर काम करत आहेत. पण सत्ता कुणाचीही येऊ दे, पहिल्या १०० दिवसांच्या रोडमॅपमध्ये फारसा काही बदल करावा लागू नये या पद्धतीने प्रशासकीय अधिकारी हा प्लॅन तयार करत आहेत.

केंद्रीय कृषी आणि शेतकरी मंत्रालयाकडून कृषी विभागामध्ये समन्वयासाठी एक परिषद स्थापन करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात येत आहे. परिषदेला राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण परिवर्तन परिषद असे नाव दिले जाऊ शकते. सरकारशी संबंधित सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या महिन्याच्या अखेरीस परिषदेचा संपूर्ण रोडमॅप तयार केला जाईल. परिषदेचे कामकाज जीएसटी परिषदेच्या धर्तीवर असू शकते. नवीन सरकार स्थापनेच्या १०० दिवसांच्या आत, ग्राहक विभाग एक प लॉन्च करणार आहे जे ग्राहकांना डार्क पॅटर्न किंवा फसवणुकीपासून वाचवेल. त्यासंदर्भात मंत्रालयात जोरदार तयारी सुरू आहे

मित्रांनी लावली मोटरसायकलीची पैज : आली अंगलट

# संजय पाटील की विशाल पाटील येणार?

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**सांगली** प्रतिनिधी

सांगली लोकसभा निवडणुकीत भाजपाचे उमेदवार संजय पाटील आणि अपक्ष उमेदवार विशाल पाटील यांच्या समर्थकांनी मोटरसायकलीची पैज लावली होती. समर्थकांनी आपापला उमेदवार विजयी होईल यावर मोटरसायकलीची पैज लावणाऱ्या तालुक्यातील दोघांवर कवठेमहांकाळ पोलिसांनी कारवाई केली आहे. पैज लावणाऱ्या समर्थकांच्या ही पैज लावणे चागलेच अंगलट आली. हा प्रकार कवठेमहांकाळ तालुक्यातील शिरढोण आणि बोरगांव येथे घडला.

कवठेमहांकाळचे पोलीस निरीक्षक जोतीराम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी बोरगाव, शिरढोण येथील दोघांना ताब्यात घेवून दोघांनी पैजेत लावलेली सुमारे दोन लाख पंधरा हजार रूपये किंमतीच्या दोन मोटरसायकली जप्त केल्या. ही कारवाई करण्यात आली. रमेश संभाजी जाधव आणि गौस मुबारक मुलाणी याच्यावर पोलीस ठाण्यात



महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्याखाली गुन्हा दाखल झाला. बोरगाव येथील रमेश संभाजी जाधव आणि शिरढोण येथील गौस मुबारक मुलाणी यांनी सांगली लोकसभा निवडणुकीचा निकालाबाबत भाजप पक्षाचा उमेदवार निवडून येईल की अपक्ष उमेदवार निवडून येईल यासाठी स्वतःच्या फायद्याकरता निवडणुकीतील उमेदवारावर बुलेट आणि युनिकॉर्न गाड्यावरती पैजा लावल्या होत्या.

### तात्काळ कारवाईचे आदेश

पैज लावून संदेश सोशल मिडियाद्वारे प्रसारित केला होता. या पैजेची तालुक्यात सर्वत्र चर्चा सुरू होती. पैजा लावल्याची माहिती पोलीस निरीक्षक जोतीराम पाटील यांना समजताच त्यांनी तात्काळ कारवाईचे आदेश दिले. पोलिसांनी शुक्रवारी सायंकाळी साडे पाचच्या सुमारास कारवाई करत दोघांना ताब्यात घेत दोघांच्या दोन्ही दोन लाख पंधरा हजाराच्या मोटरसायकली जप्त केल्या. दोघावर पोलिसांत महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्याखाली गुन्हा दाखल झाला आहे.

# लोकसभा निवडणुकीत पीएमपीएमएल मालामाल!

## मतदान प्रक्रियेमध्ये दिलेल्या ९३१ गाड्या

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पुणे** प्रतिनिधी

पुण्याच्या सार्वजनिक वाहतुकीची जीवनवाहिनी असणाऱ्या पीएमपीएमएलने लोकसभा निवडणुकीत भरघोस उत्पन्न कमावलं आहे. नेहमीच तोट्यात असणारी पीएमपीएमएल लोकसभा निवडणुकीत मात्र मालामाल झाली आहे. पुणे जिल्ह्यातील पुणे, शिरूर, मावळ, बारामती या लोकसभा मतदारसंघासाठी दोन टप्प्यात मतदान झाले. ७ मे आणि १३ मे रोजी या चार मतदारसंघासाठी मतदान प्रक्रिया पार पाडण्यात आली. या मतदान प्रक्रियेमध्ये मतपेट्या वाहून नेण्यासाठी पीएमपीएमएलकडून ९३१ गाड्या देण्यात आल्या होत्या. यामधूनच पीएमपीएमएल प्रशासनाला तब्बल एक कोटी ५७ लाखांचे उत्पन्न मिळाले आहे.

दरम्यान, लोकसभा, विधानसभा आणि महापालिका निवडणुकांमध्ये पीएमपीएमएलकडून मतपेट्या वाहून नेण्यासाठी प्रत्येक निवडणुकीत बस पुरवण्यात येत असतात. त्यासाठी कोणत्या मतदान केंद्रावर किती बस हव्या आहेत याची माहिती निवडणूक नियोजन अधिकारी पीएमपीएमएलला देत असतात. त्यानुसारच पुणे जिल्ह्यातील चार लोकसभा मतदारसंघात ९३१ बस मतपेट्या वाहून नेण्यासाठी वापरण्यात आल्या. यामध्ये प्रामुख्याने बारामती लोकसभा मतदारसंघातील पुणे शहराच्या लगत येणारा मतदारसंघ अर्थात खडकवासला विधानसभा मतदारसंघात ११३ बस पुरवण्यात आल्या होत्या. शिरूर लोकसभा मतदारसंघांमध्ये येणाऱ्या भोसरी आणि हडपसर विधानसभा मतदारसंघांमध्ये १४० बस पुरवण्यात आल्या होत्या. तर मावळ लोकसभा मतदारसंघांमध्ये येणाऱ्या चिंचवड आणि पिंपरी या विधानसभा मतदारसंघासाठी १७५ बस देण्यात आल्या होत्या. तर सर्वाधिक ५०३ बस या पुणे लोकसभा मतदारसंघ देण्यात आल्या होत्या. यामधून पीएमपीएमएलला तब्बल दीड कोटींचे उत्पन्न मिळाले आहे. त्यामुळे एरवी सतत तोट्यामध्ये असणारी पीएमपीएमएल लोकसभा निवडणुकीमध्ये मात्र मालामाल झाली आहे.

### ब्रेकडाऊन थांबणार कधी?

लोकसभा निवडणुकीमध्ये पीएमपीएमएल फायद्यात आली असली, तरी पीएमपीएमएलचा ब्रेक डाऊनचा प्रश्न मात्र ऐरणीवर आहे तसाच आहे. मागील काही दिवसात तब्बल साडेतीनशे बस ब्रेकडाऊन झाल्याची नोंद करण्यात आली आहे. पीएमपीच्या ताब्यात १९४८ इतक्या बसेस आहेत. त्यापैकी १४०० ते १५०० बसच मार्गावर अस-तात. त्यातही जवळपास ५० बस या दररोज ब्रेक डाऊन होत असल्याची नोंद आहे. त्यामुळे पुणेकरांना याचा मनस्ताप सोसावा लागत आहे. ८ ते १४ एप्रिल दरम्यानची आकडेवारी पाहिली तर ३४९ बस ब्रेकडाऊन झाल्या आहेत.

# मतदार राजा, हक्क बजावायलाच हवा...!

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** प्रतिनिधी

मुंबईत सोमवारी मतदान आहे. मी सर्व मुंबईकरांना आवाहन करतो की, त्यांनी घराबाहेर पडून मतदान करावे आणि ते जबाबदारीने करावे', असे आवाहन ज्येष्ठ व प्रसिद्ध उद्योगपती पद्मविभूषण रतन टाटा यांनी शनिवारी आपल्या 'एक्स अकाऊंट'च्या माध्यमातून मुंबईतील नागरिकांना केले. त्यांच्याप्रमाणेच प्रसिद्ध उद्योगपती आनंद महिंद्रा, अभिनेता सलमान खान, अक्षयकुमार,

### रतन टाटा यांच्यासह अनेक मान्यवरांचा आग्रह

मुंबई पोलिस आयुक्त विवेक फणसळकर अशा अनेक मान्यवरांनीही सोशल मीडियावर व्यक्त होत मतदारांना मतदानाचे आवाहन केले आहे.

'जगभरात अनेकांना जो हक्क नाही, तो आपल्याला आहे. तो मतदानाचा हक्क मी २० मे रोजी बजावणारच आहे. तुम्ही तुमच्या मतदार नोंदणीबाबत साशंक असाल तर केंद्रीय निवडणूक आयोगाच्या voters.eci.gov.in या वेबसाइटवर तपासून घ्या आणि जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीचा भाग व्हा', असे आवाहन आनंद महिंद्रा यांनी 'एक्स'वर केले आहे. 'मुंबई पोलिस आयुक्त या नात्याने मी सर्व नागरिकांना आवाहन करतो की, मतदानाचे आपले कर्तव्य अवश्य पार पाडा' अशी पोस्ट मुंबईचे पोलिस आयुक्त विवेक फणसळकर यांनी 'एक्स' वर केली आहे. 'मुंबईकरांनो आपला खासदार निवडण्यासाठी पाच वर्षांतून एकदाच संधी मिळते. चुकूनही ही संधी घालवू नका. सोमवारी आपल्या देशासाठी कर्तव्य पार पाडा. नक्की मतदान करा.

# राजकीय जन्म देणाऱ्या संघाला भाजप संपवायला निघाला!

## 'ते' संघावरही बंदी घालतील : ठाकरेंची टीका

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** प्रतिनिधी

'देशात एकच पक्ष राहील, असे काही दिवसांपूर्वीच भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा म्हणाले होते. काही दिवसांपूर्वी एका वर्तमानपत्राला दिलेल्या मुलाखतीत, भाजप स्वयंपूर्ण झाला असल्याचे सांगतानाच आता राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची (आरएसएस) गरज नसल्याचे ते म्हणाले. ज्यांनी राजकीय जन्म दिला, त्या संघालाच भाजप नष्ट करायला निघाला असून, हा पक्ष 'आरएसएस'लाही नकली संघ म्हणून त्यावर बंदी घालू शकतो,' अशी टीका शिवसेना (उबाठा) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी शनिवारी केली. 'इंडिया' आघाडी महाराष्ट्रात लोकसभेच्या ४८पैकी ४६ जागा जिंकेल, असा विश्वास काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी व्यक्त केला. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी अन्नसुरक्षा कायदा डॉ. मनमोहन सिंग सरकारचाच असल्याचा दावा या वेळी केला.

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यासाठी सोमवारी मतदान होणार आहे. शनिवारी प्रचाराच्या अखेरच्या दिवशी 'इंडिया'तर्फे मुंबईतील पंचतारांकित हॉटेलमध्ये पत्रकार परिषद घेण्यात आली. उद्धव, खर्गे, पवार यांच्यासह काँग्रेसचे महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेन्नितला, खासदार संजय राऊत, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण आदी या प्रसंगी उपस्थित होते.

मोदींसाठी नाराजी दूर ठेवली : आठवलेंनी खदखद बोलून दाखवली

# उमेदवारीसाठी फडणवीसांकडून प्रयत्न, पण शिंदेंनी...

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**नाशिक** प्रतिनिधी

'राज्यात महायुतीच्या लोकसभेच्या जागावाटपात रिपब्लिकन पक्षाने दोन जागांची मागणी केली होती. मी स्वत: शिर्डीमधून लोकसभा निवडणूक लढण्यासाठी इच्छुक होतो. परंतु, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जागा देण्यास नकार दिला. त्यामुळे मी नाराज झालो. मात्र, नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी आपण नाराजी दूर ठेवली,' अशी सल केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केली. 'मंत्री छगन भुजबळ यांचे नाव स्पर्धेत असताना त्यांना तिकीट न मिळाल्याने ते नाराज होणे साहजिक आहे. पण त्यांची नाराजी दूर करू,' असेही आठवले म्हणाले.

महायुतीचे उमेदवार हेमंत गोडसे यांच्या प्रचारासाठी आठवले नाशिकमध्ये आले होते. यावेळी पत्रकारांशी बोलताना त्यांनी मनातील खदखद बोलून दाखवली. 'लोकसभा निवडणूक लढवावी अशी आमच्या लोकांची इच्छा होती. मी देखील त्यासाठी शिर्डीतून लोकसभेत जाण्यास इच्छुक होतो. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही त्यासाठी प्रयत्न केले. परंतु, मुख्यमंत्री शिंदे यांनी सदाशिव लोखंडेसाठी ताकद लावली. लोखंडे माझ्यासोबत आल्याचे सांगत त्यांनी आम्हाला जागा देण्यास नकार दिला. त्यामुळे लोकसभेत प्रतिनिधित्व करण्याचे स्वप्न पूर्ण होत नसल्याने मी नाराज आहे. परंतु, मोदींसाठी नाराजी दूर ठेवली. राज्यसभा कायम ठेवून केंद्रात कॅबिनेट मंत्रिपदासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री फडणवीस व अन्य मंत्र्यांनी दिले आहे,' असे आठवले यांनी सांगितले.

### राऊतांच्या टीकेला उत्तर

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या मुंबईतील रोड शोसाठी महापालिकेने सव्वातीन कोटींचा खर्च केल्याचा टीका खासदार संजय राऊत यांनी केली होती. त्यावर, 'आधी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या रोड शोचा खर्च काढला पाहिजे,' असा टोला लगावत राऊतांचे आरोप आठवले यांनी फेटाळले. 'उद्धव ठाकरे व संजय राऊत यांना आर-ोप करायची सवय आहे. महाविकास आघाडीतील विकास हा शब्द काढून महाआघाडी एवढाच उल्लेख करावा,' असा टोलाही आठवले यांनी लगावला.

# निवडणुकीच्या तोंडावर भाजपला दणका

## धुळे जिल्हाध्यक्षाविरुद्ध पोक्सोअंतर्गत गुन्हा

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**धुळे** प्रतिनिधी

धुळ्यातील एका अल्पवयीन मुलीचे लहान बहिण आणि भाऊ हे गजेंद्र अंपळकर यांच्या हर हर महादेव या व्यायाम शाळेत कुस्ती शिकण्यासाठी जात होते. या ठिकाणी प्रशिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या रितिक उर्फ दादू राजेंद्र राजपूत पीडित तरुणीशी अंगलट करण्याचा प्रयत्न केला. तसेच 'तू मला आवडतेस मला तुझ्याशी लग्न करायचे' असे सांगून आग्रह धरला. 'माझे ऐकले नाही तर तुझ्या परिवाराला जीवे ठार मारेल' अशी धमकी ही दिली. १० जानेवारी रोजी याच कारणावरून पीडितेसह तिची आई आणि कुटुंबातील सदस्यांना रस्त्यात अडवून पुन्हा जबरदस्ती करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. तसेच पीडित तरुणीशी अंगलट येण्याचाही प्रयत्न केला. आरडा ओरड करून स्वतःची सुटका करून घरी जात असताना भाजपा धुळे जिल्हाध्यक्ष गजेंद्र आंपळकर यांनी पोलिसात न जाण्याची धमकी दिली. मात्र तरीही पीडित तरुणीची बहीण आणि तिची आई दोन्ही भावांसह चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यात गेले असता संबंधित पोलिसांनी त्यांची तक्रार नोंदवून घेतली नाही. याउलट माजी उपमहापौर कल्याणी अंपळकर यांनी दाखल केलेली खोटी तक्रार नोंदवून घेत फिर्यादी, तिची आई आणि दोन्ही भावांना अटक केली.


# दहशतवाद्यांच्या दुहेरी हल्ल्याने काश्मीर हादरले!

## भाजपच्या माजी सरपंचाची हत्या

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जम्मू** प्रतिनिधी

शनिवारी दहशतवाद्यांच्या दुहेरी हल्ल्याने जम्मू-काश्मीर हादरले. शोपियांमध्ये दहशतवाद्यांनी भाजपशी संबंधित माजी सरपंचाची गोळ्या झाडून हत्या केली. दुसरी घटना पहलगाममध्ये उघडकीस आली आहे. जिथे जयपूरहून भेटायला आलेल्या जोडप्यावर दहशतवाद्यांनी गोळीबार केला. दोघांनाही गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेनंतर दोन्ही ठिकाणी संपूर्ण परिसराची नाकेबंदी करून शोधमोहीम सुरू आहे.

अधिकाऱ्यांनी सांगितले की, शोपियानमध्ये दहशतवाद्यांनी माजी सरपंचाची गोळ्या झाडून हत्या केली. तासाभरात दक्षिण काश्मीरमध्ये झालेला हा



दुसरा दहशतवादी हल्ला होता. शनिवारी शोपियान जिल्ह्यातील हरपोरा भागात दहशतवाद्यांनी माजी सरपंच एजाज शेख यांची गोळ्या झाडून हत्या केली. एका अधिकाऱ्याने सांगितले की, माजी सरपंचावर संध्याकाळी हरपोरा भागात दहशतवाद्यांनी गोळीबार केला. त्याने सांगितले की, हल्ल्यानंतर त्याला ताबडतोब जवळच्या आरोग्य सुविधेत नेण्यात आले, जिथे तो गंभीर जखमी झाला. हॉस्पिटलच्या अधिकाऱ्यांनीही त्याला मृत रुग्णालयात आणल्याची पुष्टी केली. हल्लेखोरांना पकडण्यासाठी पोलीस आणि सुरक्षा दलांनी परिसराची नाकेबंदी केली आहे. यापूर्वी, अनंतनाग जिल्ह्यात राजस्थानमधील जयपूरहून भेटायला आलेल्या जोडप्यावर दहशतवाद्यांनी गोळीबार केला होता. दोघेही गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

### मुफ्तींनी केला हल्ल्याचा निषेध

दहशतवाद्यांना पकडण्यासाठी सर्च ऑपरेशन सुरू आहे. जम्मू-काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री आणि पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टीच्या (पीडीपी) प्रमुख मेहबूबा मुफ्ती यांनी स्थानिक नसलेल्यांवर झालेल्या हल्ल्याचा निषेध केला. अलिकडच्या काही महिन्यांत जम्मू-काश्मीरमध्ये स्थानिक नसलेल्या लोकांवर झालेला हा हल्ला धक्कादायक आहे. एप्रिलमध्ये शोपियान जिल्ह्यात एका गैर-स्थानिक मार्गदर्शकाची दहशतवाद्यांनी गोळ्या झाडून हत्या केली होती. यापूर्वी फेब्रुवारीमध्ये श्रीनगरमध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या गोळीबारात दोन गैर-स्थानिकांचा मृत्यू झाला होता.

### शोध मोहीम सुरूच

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दहशतवाद्यांनी अनंतनागमधील पर्यटक कॅम्पला लक्ष्य करून गोळीबार केला. या गोळीबारात जयपूर येथील दोन जण जखमी झाले आहेत. जखमी फरहा आणि तिचा पती तबरेज यांना गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले. काश्मीर झोन पोलिसांनी ट्विट केले की, यान्नार, अनंतनाग येथे दहशतवाद्यांनी जयपूर महिला फरहा आणि तिचा पती तबरेज यांच्यावर गोळीबार केला आणि त्यांना जखमी केले. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. परिसराची नाकेबंदी करण्यात आली आहे.

हे पत्र लोकशाही इनोवेशन्स प्रायव्हेट लिमिटेड मालकीचे त्यांच्या वतीने मुद्रक, प्रकाशक, संपादिका शांता कमलाकर वाणी यांनी लोकशाही इनोवेशन्स प्राइवेट लिमिटेड एम-१८१, एमआयडीसी जळगाव जिल्हा जळगाव ४२५००२ (महाराष्ट्र) येथून छापून २२०, बळीराम पेठ, जळगाव जिल्हा जळगाव ४२५००१ महाराष्ट्र येथे प्रसिद्ध केले.
This LOKSHAHI newspaper is owned by Lokshahi Innovations Private Limited and printed on its behalf by Shanta Kamalakar Wani, Printer, Publisher, Editor at Lokshahi Innovations Private Limited M-181, MIDC Jalgaon District Jalgaon 425002 (Maharashtra). Published at 220, Baliram Peth, Jalgaon District Jalgaon 425001 Maharashtra.आर.एन.आय.नं MAHMAR/२००९/३३०२८ पोस्टल रजी. नंबर - No.JAL/16/2024-26 EMail- lokshahilive@gmail.com, वर्ष १५ वे. जळगाव फोन नं. ०२५७-२२३७४९१,२२४१४९१,२९७०३६८.
संपर्क कार्यालय: मुंबई- १०, शंकेश्वर सोसायटी, मानपाडा रोड, नवजीवन हॉस्पीटल समोर, डोंबीवली पूर्व जि. ठाणे, मो. नं. ९४२२२८४५११. सहाय्यक संपादक राजेश यावलकर, सल्लागार संपादक धों. ज. गुरव, (पी. आर. बी. कायद्यानुसार) संपादकीय जबाबदारी यांची आहे.